दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –१९८ शनिवार दि.२८ मार्च २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-198 Saturday, Dt.28 March 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# देशात लॉकडाउन लागणार नाही

## केंद्र सरकारच्या मंत्र्यांकडून स्पष्टोक्ती भीतीची परिस्थिती निर्माण करू नका

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील संकटामुळे देशात देशव्यापी लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, असे केंद्र सरकारने शुक्रवारी स्पष्ट केले. सरकारचे तीन वरिष्ठ मंत्री निर्मला सीतारामन, किरण रिजिजू आणि हरदीप पुरी यांनी निवेदने जारी करून या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केले. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे रिजिजू यांनी नमूद केले आणि खुद्द पंतप्रधान मोदी स्वत: या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले.



पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनीही जनतेला घाबराट निर्माण न करण्याचे आवाहन केले आणि लॉकडाऊन लागू करण्याचा सरकारचा कोणताही इरादा नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. वास्तविक पाहता, चार दिवसांपूर्वी संसदेत पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका विधानानंतर लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली होती. सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या कठीण जागतिक परिस्थितीचा परिणाम दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे असे त्यांनी म्हटले होते. अशा प्रकारच्या आव्हानांचा सामना देशाने यापूर्वीही, अगदी कोविड–१९ महामारीच्या काळातही, एकजुटीने आणि एकोप्याने केला आहे, असेही त्यांनी पुढे नमूद केले. आज संध्याकाळी पंतप्रधान सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही नियोजित आहे.

संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी स्पष्ट केले, या सर्व अफवा कोण पसरवत आहे? पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, घाबरण्याची काहीही गरज नाही. साठेबाजांना (होर्डर्सना) इशारे देण्यात आले आहेत आणि राज्य सरकारांना साठेबाजी होणार नाही याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संपूर्ण परिस्थिती भारत सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणात आहे. सर्वसामान्य जनतेला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी, अगदी सर्वोच्च स्तरापासून ते तळागाळापर्यंत–प्रत्येक पातळीवर देखरेख केली जात आहे; खुद्द पंतप्रधानही स्वत: या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.



### अनावश्यक भीतीचे वातावरण : हरदीप पुरी

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नमूद केले की, लॉकडाऊनबाबत पसरणा–या अफवा पूर्णपणे खोट्या आहेत. मला हे स्पष्ट करायचे आहे की, सध्या सरकारी पातळीवर अशा कोणत्याही प्रस्तावाचा विचार सुरू नाही. अशा वेळी, आपण सर्वांनी शांत, जबाबदार आणि एकजूट राहणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अफवा पसरवणे आणि अनावश्यक भीतीचे वातावरण निर्माण करणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

## गाडीची साईट का दिली नाही म्हणत आरोपी गणेश जालिंदर काळे याची महिलेस शिवीगाळ

गेवराई (प्रतिनिधी)

शेतातील गव्हाचे खळे करून घरी येत असताना पाठीमागून येणाऱ्या गणेश जालिंदर काळे यांनी तुम्हाला साईट देता येत नाही का? असे म्हणत मोटरसायकल बैलगाडीला आडवी लावून शिवीगाळ केली तसेच महिलेला चप्पल उगारली असल्या प्रकरणी अशा शांतिनाथ कनाके यांच्या फिर्यादी वरून गणेश जालिंदर काळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

गेवराई येथील पांडुरंग आतकरे हे गव्हाचे खळे करून घरी येत असताना पाठीमागून येणाऱ्या गणेश जालिंदर काळे यांनी बैलगाडीला मोटरसायकल आडवी लावून तू साईट का दिली नाही असे म्हणत शिवीगाळ केल्याने आशा शांतिनाथ कनाके यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही शिवीगाळ केली व चप्पल उघारली त्यानंतर त्यांच्या मुलाच्या मोबाईलवर फोन लावून तुझ्या आईला समजून सांग नसता असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली तसेच घरी येऊन चाकू काढून धमकावले सदरील घटना दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ८: ३० वा. च्या सुमारास घडली असून अशा शांतिनाथ कनाके यांच्या फिर्यादीवरून गणेश जालिंदर काळे यांच्या विरोधात गेवराई पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सरवदे यांच्याकडे देण्यात आला.

आरोपीने चाकू काढूला एनसी मध्ये चाकू चा उल्लेख नाही

गेवराई पोलीस स्टेशन नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्ध झोतात येत आहे. फिर्यादी आशा शांतिनाथ कनाके ह्या फिर्याद देताना वारंवार सांगत होत्या की, आरोपी आमच्या घरी येऊन आम्हाला धमक्या देत त्यांनी चाकू काढला परंतु गेवराई पोलीस स्टेशन ने एनसी मध्ये चाकूचा उल्लेखच केला नाही.

## माझ्या कातड्याचे जोडे केले तरी तुमचे प्रेम फेडू शकणार नाही – ना. पंकजा मुंडे

### पंकजाताई गणेशानंद गडाच्या भगिनी – विक्रमानंद महाराज

पाटोदा (प्रतिनिधी)

गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, मी ही शपथ चितेवर खाल्ली आहे. गोपीनाथ मुंडे या नावाच्या संस्कारावर तुमचा किती विश्वास आहे. तुम्ही किती रे प्रेम करता माझ्यावर.. याची कशी परतफेड करू. माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायात घातले तरी ही फेड होणार नाही, अशा शब्दांत राज्याच्या



पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी भायाळा येथे आपल्या भावना व्यक्त केल्या.

भायाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या महामंडलेश्वर त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज गणेशानंद गडाच्या नारळी सप्ताह आणि नामजप यज्ञ सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे काल संध्याकाळी भेट दिली, त्यावेळी त्या बोलत होत्या. ह.भ.प. राधाताई सानप, गणेशानंद गडाचे मठाधिपती विक्रमानंद शास्त्री महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्त यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभूतपूर्व जंगी स्वागत, जनतेच्या प्रेमाची पदराने काढली दृष्ट...

यावेळी ग्रामस्थांनी पंकजाताई मुंडे यांचे अत्यंत आपुलकीने

।पान २ वर...

## अडीच वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार, माणुसकीला काळीमा फासणारी घटना

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. अवघ्या दोन वर्षे पाच महिने वयाच्या चिमुरडीवर तिच्या १५ वर्षीय नातेवाईकाने लैंगिक अत्याचार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाहून आरोपीने हे कृत्य केले असून, पीडितेचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन अहवालातून हा प्रकार उघड झाला आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील एका गावातील ही चिमुरडी १७ मार्च २०२६ रोजी घरासमोरील पाण्याच्या हौदात पडून मयत झाली होती.सुरुवातीला हा केवळ अपघात वाटत असल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यातही आली होती. मात्र, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी शवविच्छेदन करताना मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निदर्शनास आणून दिले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत,अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधिक्षक ऋषिकेश शिंदे यांच्याकडे मार्गदर्शनाखाली तातडीने सखोल तपास सुरू केला.

तपासादरम्यान पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले आणि त्यांच्या पथकाने अत्यंत गोपनीयरीत्या माहिती गोळा केली. पीडितेच्या मृत्यूनंतर संशयित आरोपी असलेला तिच्या आत्याचा मुलगा (वय १५ वर्षे ०५ महिने) हा तीन दिवस जेवला नव्हता

।पान २ वर...

## मोमीनपुऱ्यातील मोठ्या नाल्यांच्या स्वच्छता, रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात

### आ. विजयसिंह पंडित यांच्याकडून पाहणी

बीड (प्रतिनिधी)

शहरामध्ये नगर पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेबरोबरच आता पावसाळ्यापूर्वीची स्वच्छतेची महत्वाची कामे हाती घेण्यात येत आहेत. पहिल्याच पावसात मोठ्या नाल्या तुंबून शहरात पाणी साचल्या जायचे याची खबरदारी म्हणून मोठे नाले स्वच्छ करण्यात येत आहेत. या धर्तीवर मोमीनपुऱ्यातील मोठा नाला चांदनी चौक येथून स्वच्छ व रुंदीकरण करण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. या कामाची आ. विजयसिंह पंडित यांनी पाहणी करून आवश्यक



त्या सूचना दिल्या आहेत. यावेळी त्यांच्यासमवेत नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम, गटनेते खुर्शीद आलम उपस्थित होते.

शुक्रवार, दि.२७ मार्च रोजी शहरातील मोमीनपुरा भागामधून वाहणाऱ्या मोठ्या नाल्यांच्या स्वच्छता आणि रुंदीकरणाच्या कामाला नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाने सुरुवात केली यावेळी आ. विजयसिंह पंडित यांची उपस्थिती होती. नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्यासमवेत आ. विजयसिंह पंडित यांनी या कामाची पाहणी करत शहरातील स्वच्छतेबाबतच्या आढावा स्वच्छता विभागाकडून घेतला. यावेळी नगरसेवक वाजेद कुरेशी, मनोज गोडसे यांच्यासह नगर पालिकेचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

।पान २ वर...

## धम्मदीप बुद्ध विहार येथे प्रियदर्शी सम्राट अशोक जयंती उत्साहात संपन्न

### माया दिवाण व बौद्धाचार्य भास्कर सोनवणे यांचा सत्कार

बीड (प्रतिनिधी)

महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर पालवण रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीदिनी अभिवादन कार्यक्रम उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी माया दिवाण व बौद्धाचार्य भास्कर सोनवणे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

युद्धात निपुण असलेल्या प्रियदर्शी सम्राट अशोकाने तलवारीच्या जोरावर जवळपास चक्रवर्ती सम्राट पद मिळवले होते. परंतु कलिंगा युद्धातील नरसंहार



बघून त्यांनी तलवारीचा त्याग करून तथागतांच्या प्रज्ञा, शिल,करुणा मैत्री,समता, शांती व मानवाच्या कल्याणाचा पंचशील व अत:दीप भव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला शरण जाऊन व तसे आचरण करून जगात लोककल्याणकारी सम्राट म्हणून कार्य केले. त्यांचा आदर्श समोर ठेवून जगाला युद्ध नको, तर बुद्ध विचारांची गरज आहे असे प्रतिपादन प्राध्यापक डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले.

या कार्यक्रमाला अध्यक्षपदी प्रा. डॉ. नामदेव शिनगारे लाभले

।पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय....

# मध्यस्थीसाठी विलंब का?

आखाती प्रदेशात उद्भवलेल्या अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्धामुळे भारतासह इतर अनेक देशांत इंधन आणि नैसर्गिक वायू पुरवठ्याची साखळी कमालीच्या संकटात सापडली. सामान्य लोक गॅस सिलिंडरसाठी रांगेत ताटकळताना दिसले. मात्र केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री इंधनाबाबत काळजी करू नये असे सांगत आहेत हा विरोधाभास नव्हे काय? भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतीय जनतेला या आव्हानात्मक परिस्थितीचा सामना धैर्य दाखवून करण्यासाठी सांगत आहेत. शांततेचा नेहमीच पुरस्कार करणा-या भारताने युद्ध थांबवण्यासाठी मध्यस्थी करावी अशी अपेक्षा अनेक देशांच्या प्रमुखांनी बोलून दाखवली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांनी युद्ध पाच दिवसांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतला. या परिस्थितीचा फायदा घेऊन इराणच्या विरोधातील युद्ध संपुष्टात आणण्यासाठी पाकिस्तानने मध्यस्थी करण्यासाठी संधिसाधूपणा दाखवला. पश्चिम आशियातील युद्ध पाकिस्तानसारख्या आपल्या शत्रूराष्ट्राने केलेल्या मध्यस्थीने थांबले तर त्याचे श्रेय पाकिस्तानला देण्याची तत्परता ट्रम्प दाखवतील यात शंका नाही. नाही तरी डोनाल्ड ट्रम्प भारताचे महत्त्व डावलण्याचा नेहमीच प्रयत्न करतात. भारताने युद्ध थांबवण्यासाठी मुत्सद्देगिरी दाखवण्यात विलंब का केला असा प्रश्न पडतो. कारण आता भारतीय पंतप्रधानांना जाग येताना दिसतेय. पश्चिम आशियातील युद्धाचा फटका सर्वांनाच बसत असल्याने ते लवकरात लवकर थांबायला हवे असा संदेश पंतप्रधान मोदींनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिला आहे म्हणे.

बुधवारी संसदेत आयोजित सर्वपक्षीय बैठकीत केंद्र सरकारने ही माहिती दिली. युद्धात पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेचा संदर्भ देताना सरकारने, आम्ही पाकिस्तानसारखे 'दलाल' राष्ट्र नाही, अशा कडक शब्दांत शेजारील देशावर टीका केली. या युद्ध स्थितीत पाकिस्तान मध्यस्थीचे जे प्रयत्न करत आहे त्यात काहीही नवीन नाही. १९८१ पासून अमेरिकेने पाकिस्तानचा अशा कामासाठी वापर केला आहे, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी बैठकीत सांगितल्याचे सूत्रांनी म्हटले आहे. पश्चिम आशियातील संकटावर भारत गप्प असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. मात्र, सरकारने हा दावा फेटाळून लावत 'आम्ही परिस्थितीवर सतत भाष्य करत आहोत आणि प्रतिसादही देत आहोत' असे स्पष्ट केले. इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या निधनावर भारताने शोक व्यक्त करण्यास उशीर केला आणि 'नैतिक कमजोरी' दाखवली, असा आरोपही विरोधकांनी केला. यावर उत्तर देताना सरकारने सांगितले की, इराणी दूतावास उघडल्यानंतर परराष्ट्र सचिवांनी तात्काळ तिथे भेट देऊन शोकपुस्तिकेवर स्वाक्षरी केली होती.

बैठकीत सरकारने स्पष्ट केले की, सध्या सरकारचे मुख्य प्राधान्य आखाती देशांमध्ये राहणा-या भारतीय समुदायाची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि देशाची ऊर्जेची गरज पूर्ण करणे हे आहे. या दोन्ही आघाड्यांवर सरकार आतापर्यंत यशस्वी ठरल्याचेही सांगण्यात आले. दुसरीकडे, सरकारने दिलेल्या उत्तरांवर विरोधी पक्षांनी असमाधान व्यक्त केले. काँग्रेस नेते तारिक अन्वर यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे आणि आपण मात्र केवळ प्रेक्षक बनून आहोत. या विषयावर लोकसभेत नियम १९३ आणि राज्यसभेत नियम १७६ अंतर्गत सविस्तर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी केली. इस्रायल-इराण युद्धाला महिनाभराचा कालावधी उलटला असताना आता जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाच्या हालचाली सुरू आहेत. पाकिस्तान, ईजिप्त आणि तुर्कीने मध्यस्थ म्हणून भूमिका निभावण्यास सुरुवात केली आहे. या तिन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अमेरिकेचे दूत स्टीव्ह बिटकॉफ आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली.

# महाराष्ट्र वुमन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ ने डॉ अनिता शिंदे सन्मानित

बीड (प्रतिनिधी)

जागतिक महिला दिनानिमित्त युनाय फाऊंडेशन, पुणे यांच्यावतीने दरवर्षी महाराष्ट्रातील १६ विविध क्षेत्रातील प्रत्येकी ५ कर्तृत्ववान महिलांना महाराष्ट्र वुमन एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित केले जाते. यावर्षी शिक्षण व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य तथा इतिहास विभागप्रमुख डॉ अनिता शिंदे यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास पुण्याच्या महापौर मंजुषाताई नागपुरे, पब्लिक स्पिकर एड आदिती निट्टूरे, गौरी निगुडकर, पोलिस उपायुक्त रुक्मिणी गलांडे, मा. शितल बियाणी, युनाय फाऊंडेशनच्या सर्वेसर्वा मायाश्री गायकवाड, बरखा लाहोटी, शिल्पा खिंवसरा, व इतर मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

उपप्राचार्य डॉ अनिता शिंदे या बीड येथिल नामांकित सौ. के. एस. के. महाविद्यालयात २० वर्षांपासून कार्यरत असून शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासोबतच विविध सामाजिक कार्यातही त्यांचा उल्लेखनीय सहभाग असतो. त्यांना उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्काराने ५ वेळा सन्मानित करण्यात आले असून संशोधनपर ३५ शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत महिलांचे योगदान ' या विषयावरील शोधप्रबंधास पी. एच. डी.पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या शिस्तप्रिय व अभ्यासू वृत्तीमुळे विद्यार्थीप्रिय असून युनाय फाऊंडेशन, पुणे यांनी केलेल्या मानाच्या सन्मानाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ योगेश क्षीरसागर सहसचिव डॉ दीपाताई क्षीरसागर,नवगण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी सदस्य डॉ सौ. सारिकाताई क्षीरसागर, प्रशासकिय अधिकारी डॉ विश्वांभर देशमाने व डॉ सुधाकर गुट्टे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवानंद क्षीरसागर उपप्राचार्य डॉ संजय पाटील, कमवि उपप्राचार्य डॉ नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# मुक्रमाबादेत महादेव - पार्वती विवाह सोहळा संपन्न

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील हेमाडपंथी महादेव मंदिरात मागील अनेक वर्षांपासूनच्या परंमपरेनुसार नवसाला पावणारा शंभू महादेवाचे गुरुवारी २६ मार्च २०२६ रोजी रात्री ८:१५ वाजता रविवार महादेव - पार्वती यांचा विवाह सोहळा हजारों भाविकांच्या साक्षीने संपन्न झाला. येथील हेमाडपंथी मंदिराची स्थापना झाली तेव्हापासून शिव - पार्वती विवाह लावण्याची जुनी प्रथा आहे. यानुसार प्रत्येक वर्षी यात्रेपूर्वी रामनवमीच्या दिवशी हा विवाह सोहळा संपन्न होतो.

या विवाह सोहळ्यात माता भगीनी लहान थोर तसेच युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. विवाहानंतर महाप्रसादाचे आयोजन महाप्रसाद दाते शिवभक्त लक्ष्मण शंकरराव कनकुंटवार यांच्या वतीने करण्यात आले होते.

मुक्रमाबाद शंभु महादेव म्हणजे नवसाला पावतोच अशी भाविकांची ख्याती आहे.या विवाह सोहळा प्रसंगी महादेव मंदिर पुजारी राचप्पा स्वामी, बस्वराज स्वामी वंटगिरे, प्रतिष्ठित व्यापारी, नवयुवक, शेतकरी, खेड्यापाड्यातील भाविक पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अँड.गवळी यांना नाहक मारहाण करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी - लोकविकास महाआघाडी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे सुरक्षारक्षकांकडून एका रिक्षा चालकाला बेदम मारहाण करण्यात आली.या रिक्षाचालकाला सोडण्यासाठी आलेले इस्माईल गवळी यांना सुरक्षारक्षकांनी रिंगण करून निर्दयपणे मारहाण केली. मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या रमिज भाई तसेच संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ काढणाऱ्या पवार यांनाही सुरक्षारक्षकांनी बेदम मारहाण केली. या संपूर्ण प्रकाराचा लोकविकास महाआघाडीच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

यांप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच निरपराध नागरिकांना न्याय मिळावा या मागणीसाठी अप्पर पोलीस अधीक्षक, अप्पर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. विशेषतः विधीज्ञ इस्माईल गवळी यांना गंभीर दुखापत झाली असूनही, उलट त्यांच्यावरच ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला, ही बाब अत्यंत अन्यायकारक व संतापजनक आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत असे आवाहन करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- २४७ दि.१३.०३.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **पुजा अंकुश वाघ, रा.माहेर भायगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुजा अंकुश वाघ | स्वतः | १४.०६.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२६५ दि.-.-.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अमिना शेखलाल पठाण, रा.चुर्मापुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अल्ताफ शेखलाल पठाण | मुलगा | २०.०५.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२६६ दि.३१.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अमिना शेखलाल पठाण, रा.चुर्मापुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अल्फिया शेखलाल पठाण | मुलगी | १३.०९.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.२७.०३.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नसीम फिरदोस मोहम्मद फहीम खान पठाण, रा.नागझरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नसीम फिरदोस मोहम्मद फहीम खान पठाण | स्वतः | १७.११.१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

पान १ वरुन...

**माझ्या कातड्याचे जोडे ...**

अभूतपूर्व असे जल्लोषात स्वागत केले. गावची वेस ते कार्यक्रम स्थळापर्यंत सजवलेल्या रथावरून, जेसीबीतून पुष्पवर्षाव करत त्यांची मिरवणूक काढली. आबाल वृद्धापासून महिलांपर्यंत अतिशय जल्लोषात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. हे स्वागत इतके अविस्मरणीय होते की, पंकजाताई मुंडे भारावून गेल्या. जाहीर कार्यक्रमात याचा उल्लेख करत व्यासपीठावरून त्यांनी उपस्थित जनता जनार्दनाची स्वतः दृष्ट काढली.

पंकजाताई गणेशानंद गडाच्या भगिनी - विक्रमानंद महाराज

गणेशानंद गडाचे मठाधिपती विक्रमानंद महाराज यांनी यावेळी भावना व्यक्त करताना पंकजाताई हया एका गडाच्या कन्या आहेत, त्यामुळे मी लेक म्हणणार नाही पण आता त्या आमच्या गणेशानंद गडाच्या भगिनी असतील. त्यांचे राजकीय भविष्य उज्ज्वल आहे, त्या मोठया पदापर्यंत नक्की पोहोचतील असा आशीर्वाद दिला.

**मोमीनपुऱ्यातील मोठ्या...**

बीड शहरातील सर्व ५२ प्रभागांमध्ये नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाच्या माध्यमातून मिशन ५२ हे स्वच्छता मिशन शहरात राबविले जात आहे. नियोजनबध्द आणि सातत्यपूर्ण ही स्वच्छता मोहिम सुरु आहे. रस्ते, नाले, बाजारपेठा व वार्डातील परिसर स्वच्छ करण्यात येत आहे. त्याचबरोबर दैनंदिन स्वच्छता मोहिम देखील राबविल्या जात आहे. साचलेला कचरा तात्काळ उचलण्यात येत आहे.

नागरीकांना कचरा उघड्यावर न टाकता घंटागाड्यांमध्ये टाकावा असे आवाहन पालिकेकडून करण्यात येत आहे. घंटागाडी न आल्यास थेट पालिकेच्या स्वच्छता विभागाची किंवा मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क करावा असे आवाहन देखील करण्यात येत आहे. शहरातील आता मॉन्सूनपुर्व स्वच्छतेची कामे हाती घेण्यात येत आहेत. मोमीनपुऱ्यातील या मोठ्या नाल्याच्या कामाची सुरुवात चांदनी चौक येथून झाली असल्याने परिसरातील नागरीकांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

**धम्मदीप बुद्ध विहार...**

होते तर प्रमुख पाहुणे म्हणून से.नि. शिक्षण अधिकारी सखाराम उजगरे, प्रा. डॉ .शिवाजीराव दिवाण, से.नी उपनिबंधक सहकार ड हनुमंत कांबळे मुख्याध्यापक वैशाली शिंदे, बौद्धाचार्य ड भास्करराव सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी. एम भोले, वाचाल तर

पान १ वरुन...

वाचाल चे अध्यक्ष डी. जी वानखेडे यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प तर सम्राट अशोक छत्रपती,शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन मान्यवरांच्या हस्ते करून विनम्र अभिवादन करण्यात आले व सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले.कार्यक्रमाचे औचित्य साधून सुप्रसिद्ध लेखिका, कवियत्री यांना नुकताच नालंदा फाउंडेशन पुणे तर्फे राज्यस्तरीय कर्तुत्व गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.तसेच बौद्धाचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल ड.भास्कर सोनवणे यांचा देखील महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहारा तर्फे पुष्पगुच्छ व धम्मपद हा ग्रंथ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी आयु.ड. हनुमंत कांबळे यांनी देखील सम्राट अशोकांच्या दैदिप्यमान जीवन पटावर सखोल प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी एम भोले यांनी केले तर आभार ड. तेजस वडमारे यांनी मानले. कार्यक्रमास अंजली वडमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव,आशाबाई भालेराव, क्रांती धनवे, मालणबाई अंकुटे रमाबाई सोनवणे, पी. वाय घोडेराव, बि.डी तांगडे, बी.जी दळवी,सुनील समुद्रे, दिलीप गवळी, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य व धम्मदीप महिला मंडळाच्या बहुसंख्य महिलांची उपस्थिती होती.


**अडीच वर्षाच्या चिमुरडीवर...**

आणि सतत रडत होता, अशी माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून मिळाली. या संशयावरून पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पीडितेच्या मृत्यूपूर्वी आठ दिवस अगोदर आरोपीने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या दुचाकीवर बसवून नेले आणि घरात कोणी नसताना मोबाईलवरील अश्लील चित्रफीत पाहून तिच्यावर अत्याचार केल्याची कबुली दिली.

या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४(१) आणि बालकांचे लैंगिक शोषण कलम ६४(१) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम २०१२ च्या कलम ४,६, ८आणि १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी स्वतः सरकारतर्फे फिर्यादी होऊन एका गुंतागुंतीच्या गुन्ह्याचा छडा लावला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पिंक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांच्याकडे सोपवण्यात आला असून, या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# अमृता आणि अपेक्षाकडून जेतेपदासाठी दावेदार!

**महिला महाराष्ट्र केसरी-२०२६बाबत गतविजेत्या भाग्यश्री फंडचे मत**





सोलापूर (प्रतिनिधी)

महिला महाराष्ट्र केसरी होण्यासाठी आता स्पर्धात्मकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अमृता पुजारी आणि अपेक्षा पाटील वैष्णवी पाटील या यंदाच्या किताबावर दावेदारी करू शकतील, असे मत याआधीच्या पहिल्या तिन्ही महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धांचे जेतेपदाचे किताब जिंकणाऱ्या भाग्यश्री फंडने व्यक्त केले.

गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करीत विजेतेपद मिळवले होते. पण यंदा चौथ्यांदा महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती पुरस्कारावर दावा करणार नसल्याचे भाग्यश्रीने स्पष्ट केले. यासंदर्भात भाग्यश्री म्हणाली, माझा सध्या वजनी गट ५९ ते ६२ किलो आहे. महाराष्ट्र केसरी गटासाठी ६५ ते ७६ किलो वजनी गट पात्र ठरतो. इतके वजन वाढवणे आता अवघड असल्यामुळेच मी यावर्षी स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.

महाराष्ट्र केसरी किताब जिंकण्यासाठी तू मागील तीन वर्षे कशी मेहनत घेतलीस, या प्रश्नाला उत्तर देताना भाग्यश्री म्हणाली, ट्रिपल महाराष्ट्र केसरी किताबावर वर्चस्व राखणे, हे मुळीच सोप्पे नव्हते. गेली तीन वर्षे मी कसून मेहनत घेतली. वजन वाढवणे, विविध डाव-प्रतिडावांचा सराव करणे, लढतीचा सराव करणे याचा यात समावेश होता.पुरुषांमध्ये महाराष्ट्र केसरी झाल्यावर शासकीय नोकरी मिळते. मी ट्रिपल महाराष्ट्र केसरी झाली. पण अजूनही मला नोकरी नाही. आम्ही बरेच प्रयत्न केले. पण ते यशस्वी ठरले नाहीत, अशी खंत भाग्यश्रीने प्रकट केली.

# जय श्रीरामच्या घोषणांनी शहर दणाणले!

## बीडमध्ये रामनवमी निमित्त भव्य मोटारसायकल रॅली







### मुस्लिम बांधवांतर्फे पाणपोई

रामनवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या दुसर रॅलीत सहभागी झालेल्या रामभक्तांसाठी मुस्लिम बांधवांनी पाणी वाटप करून सामाजिक सलोख्याचा आदर्श घालून दिला. बाशी नाका चौक येथे मंडप उभारून हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाचे आयोजन नगरसेवक शेख अफसर तसेच नगरपरिषद गटनेते खुलित आलन यांच्या पुढाकाराने मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आले. रॅलीत सहभागी झालेल्या भाविकांना पाणी वाटप करून त्यांच्या सेवेसाठी हातभार लावण्यात आला.या उपक्रमाला विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन कौतुक केले.

### आदर्श मार्केट व्यापारीकडून पोहा, थंड पाणी वाटप

रामनवमी निमित्त सायंकाळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या रामभक्तांसह नागरिकांसाठी सुभाष रोड येथे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्या वतीने गरमागरम पोह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या उपक्रमांतर्गत सुमारे तीन क्विंटल पोहे तयार करून वाटप करण्यात आले. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी शंभरहून अधिक जारमध्ये शुद्ध थंड आरओ पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणुकीत सहभागी झालेल्या भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला.

बीड (प्रतिनिधी)

रामनवमीच्या पावन निमित्ताने आज सकाळी बीड शहरात भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत मोठ्या संख्येने रामभक्त सहभागी झाले होते. भगवान श्रीरामचंद्रांच्या प्रतिमेसह निघालेल्या या रॅलीत सहभागी झालेल्या युवकांनी जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला.

ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. रॅलीदरम्यान भगवे झेंडे, ढोल-ताशांचा गजर आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या युवक-युवतींमुळे वातावरण भक्तिमय झाले होते. अनेक ठिकाणी नागरिकांनी रॅलीचे स्वागत करून पुष्पवृष्टी केली.


या रॅलीत स्थानिक युवक मंडळे, सामाजिक संस्था तसेच विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. आयोजकांच्या माहितीनुसार, शेकडो मोटारसायकलींसह हजारो रामभक्तांनी या सोहळ्यात सहभाग नोंदवला.

रामनवमीच्या पावन निमित्ताने आज सकाळी बीड शहरात भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत मोठ्या संख्येने रामभक्त सहभागी झाले होते.

# पेट्रोल ५ रुपये आणि डिझेल प्रति लिटर ३ रुपयांनी वाढले

मुंबई (प्रतिनिधी)

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधन दरवाढीचा मोठा परिणाम दिसून येत असून गुरुवारी नायरा एनर्जी या देशातील प्रमुख खासगी इंधन विक्रेत्या कंपनीने पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ जाहीर केली आहे. कंपनीने पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ५.३० रुपये तर डिझेलच्या दरात सुमारे ३ रुपयांनी वाढ केली आहे.या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचा अतिरिक्त ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीचा थेट परिणाम आता देशांतर्गत इंधन दरांवर दिसू लागला आहे.कंपनीकडून काही भागांत पेट्रोलची दरवाढ ५.३०




रुपयांपर्यंत करण्यात आली असून डिझेलचे दरही लक्षणीय वाढले आहेत. विशेष म्हणजे, गेल्या काही काळापासून पेट्रोल-डिझेलच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नव्हती. मात्र, सध्याची दरवाढ ही केवळ देशांतर्गत कारणांमुळे नसून आंतरराष्ट्रीय परिस्थितीशी निगडित आहे.इराणमधील ऊर्जा प्रकल्पांमध्ये झालेल्या अडथळ्यांमुळे जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला असून कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. परिणामी, वाढलेला खर्च ग्राहकांवर टाकणे कंपनीला भाग पडल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, सरकारी मालकीच्या इंडियन ऑईल कार्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांनी नियमित पेट्रोल-डिझेलचे दर सध्या स्थिर ठेवले आहेत. मात्र, प्रीमियम पेट्रोलच्या दरात २ ते २.३५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी एकूणच इंधन दरवाढीमुळे महागाई वाढण्याची शक्यता कायम आहे.

# त्याला मारून टाकून मोकळं व्हावं : संभाजी भिडे

नाशिक (प्रतिनिधी)

नाशिक येथील बहुचर्चित अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवीन धक्कादायक खुलासे समोर येत असून या प्रकरणामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. आरोपी अशोक खरात याने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे, धमकावून जमीन-जुमल्यावर कब्जा केल्याचे तसेच आर्थिक फसवणूक केल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत.

या प्रकरणात अनेक राजकीय नेते व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संबंध असल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरांतून जोर धरत आहे.

दरम्यान, संभाजी भिडे यांनी या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी पुण्यात श्रीराम नवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना वादग्रस्त विधान केले. आरोपी अशोक खरात याला ठार मारून सोडून द्यावे, तसेच या प्रकरणावर चर्चा करण्याचीही गरज नाही, असे वक्तव्य त्यांनी केले.



भिडे यांच्या या वक्तव्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून त्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला आहे, तर अनेकांनी या विधानावर तीव्र टीका केली आहे.

कार्यक्रमात पुढे बोलताना भिडे म्हणाले की, प्रत्येक दिवस रामनवमीप्रमाणे जगला पाहिजे. त्यांनी राम स्तोत्राचे पठण करत समाजाने रामतत्त्व स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली. समाजात विरोध करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# सरकारने औषध दरवाढीला दिली मंजुरी

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता देशातही उमटू लागले असून औषधांच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. केंद्र सरकारने २०२५ च्या घाऊक किंमत निर्देशांकाच्या (थझख) आधारे औषधांच्या दरात ०.६५ टक्क्यांनी वाढ करण्यास परवानगी दिली आहे. हा आदेश नॅशनल झहरी-रलशींळलरश्र पीरीसिंग अथॉरिटी (छझझ-)एनपीपीए कडून जारी करण्यात आला आहे.

या निर्णयानुसार औषध उत्पादक कंपन्यांना आता निश्चित सूत्रानुसार एमआरपीमध्ये वाढ करण्याची मुभा देण्यात आली असून त्यासाठी स्वतंत्र सरकारी मंजुरीची गरज भासणार नाही. त्यामुळे अत्यावश्यक औषधे काही प्रमाणात महाग होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, बृजेश गोयल यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, हीच वाढ कायम राहिल्यास दिल्लीतील व्यापार आणि उद्योग क्षेत्राला सुमारे ५,००० कोटी रुपयांचा फटका बसू शकतो.भगीरथ पॅलेस येथील वैद्यकीय साहित्य घाऊक विक्रेते मुकेश भसीन यांनी सांगितले की, प्लास्टिक ग्रॅन्युल्सच्या किमतीत वाढ झाल्यामुळे पॅकेजिंग खर्च वाढला असून त्याचा परिणाम औषधे व वैद्यकीय उपकरणांवर झाला आहे.

अलीकडील काही दिवसांत पॅरासिटामॉलच्या कच्च्या मालाच्या किमतीत सुमारे ४७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच डायक्लोफेनॅक ५४ टक्के, डायक्लोफेनॅक पोटॅशियम ३३ टक्के, अमॉक्सिसिलीन ट्रायहायड्रेट ४५ टक्के आणि सिप्रोफ्लॉक्सासिन सुमारे ६० टक्क्यांनी महागले आहे. याशिवाय सिरिंज, थर्मामीटरसारख्या दैनंदिन वापरातील वैद्यकीय उपकरणांच्या किमतीतही वाढ झाली आहे.औषधांच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर मोठा आर्थिक ताण येण्याची शक्यता असून आरोग्य खर्चात वाढ होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# आता प्रत्येक कुटुंबाला मिळणार ३ लिटर रॉकेल

आखाती देशांमध्ये सुरु असणाऱ्या युद्धाचा जगावर परिणाम होत आहे.यामुळे इंधनाचा आणि एलपीजी गॅसचा काही प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.सध्या एलपीजी गॅसच्या किंमती वाढल्या आहेत, तसेच एलपीजी गॅस बुकिंगचा कालावधी वाढला आहे त्यामुळे नागरिकांना खूप वाट पाहावी लागते. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठं पाऊल उचलले आहे.

केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. राज्यातील नागरिकांना केरोसीन वापरण्यास परवानगी मिळाली आहे. आता रेशन कार्डधारकांना केरोसीन मिळणार आहे.



केरोसीनचा वापर करुन स्टोव्हवर जेवण बनवू शकता, या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे.

एलपीजी गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरत्या स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय केरोसीन वितरण निश्चित करण्यात आले आहे.मार्च एप्रिल २०२६ मध्ये केरोसीन वाटप राज्यात तिन्ही तेल कंपन्यांकडून केले जाणार आहे. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांद्वारे केरोसीन दिले जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरा दिवसात सोडण्याचे राज्य सरकारचे आदेश आहेत.

शिधापत्रिका असलेल्या ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. त्याचसोबत ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही अशा कुटुंबांनादेखील केरोसीन मिळणार आहे. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक केरोसीन मिळवण्यासाठी पात्र असतील.

# भोंदू खरात प्रकरणात ३८ आमदार अडकणार?

नाशिकमधील कथित अंकशास्त्रज्ञ आणि भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत धक्कादायक गौप्यस्फोट केला.राज्यातील ३८ आमदारांनी अघोरी कृत्यांसाठी खरातकडे जाऊन आपल्या करंगळ्या कापल्या असून, त्याची यादी आहे, असा खळबळजनक दावा आव्हाड यांनी केला. या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. ते आमदार कोण असतील अशी जोरदार चर्चा सुर आहे.

संतांच्या महाराष्ट्रात अशा काळ्या जादूला राजमान्यता मिळणे दुर्दैवी आहे. खरातने स्वतःच्या दैवी शक्तीचा आभास निर्माण करण्यासाठी रिमोटवर चालणारे नकली साप आणि वाघाच्या कातड्याचा वापर केला.



इतकेच नाही, तर चिंचुके पॉलिश करून ते अंगठीत बसवून लोकांकडून लाखो रुपये उकळले. अनेक मोठे मंत्री आणि अधिकारी त्याच्यासमोर लोटांगण घालत होते, असा आरोपही केला.

खरात प्रकरणाचा जोरदार तपास सुरु आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात महिला आयोग अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना पहिला मोठा धक्का बसला आहे. त्यानंतर इतरही अनेक आमदार मंत्रि यांचे खरात सोबत फोटो आहेत. त्यामुळे ३८ आमदारांनी नावे समोर येण्याची शक्यता आहे. ती नावे समोर आल्यास त्यावर काय कारवाई होईल हे पहावे लागेल. जादू टोणा कायद्याअंतर्गत सर्व आमदार यांच्यावर कारवाई झाल्यास ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठी घटना होईल.

# नवनियुक्त पोलीस पाटील व केंद्रप्रमुखांचा आर्वी येथे सन्मान! सेवानिवृत्त मुख्य अभियंता यांनी केला सत्कार !

शिरूर कासार (प्रतिनिधी)

तालुक्यात नुकत्याच पोलीस पाटील पदाच्या जागेवर भरती प्रक्रिया पार पडल्या तर केंद्रप्रमुखांच्याही नेमणूका झाल्या या सर्वांचा आर्वी येथे सेवानिवृत्त मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांनी यथोचीत सत्कार करून त्यांना यथोचित पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले .

भगवान नितळ यांची केंद्रप्रमुख पदी निवड झाली तर विशाल आरेकर यांची पोलीस पाटील आर्वी साठी , प्रशांत तुपसौंदर बावीचे पोलीस पाटील



झाले , राम माळी यांना शिरापुर धुमाळचे पोलीस पाटील म्हणून नेमणूक मिळाली यांना सर्वांना मळेकर यांनी सन्मानाने आर्वी येथे निमंत्रित करून त्यांचा सत्कार तर केलाच शिवाय आपल्या खांद्यावर आलेल्या जबाबदारीची जाणीव करून देत मोलाचे मार्गदर्शन केले .

या वेळी घरगिने , विष्णूपंत नितळ , बंडू फरताडे , शरद पवळ , रावसाहेब जोगदंड , सुभाष मस्के , सोमनाथ देवकते , भरत घरगिने , बापु शिंदे , राम साळवे , अशोक सुसकर , पिंटू आरेकर , आयुब शेख , मुन्ना नागरगोजे आदी उपस्थित होते

# कै. रमेश चांगदेव पा. डांगे यांचे प्रथम पुण्यस्मरण; कोऱ्हाळे येथे हरि कीर्तनाचे आयोजन

नगर ।प्रतिनिधी

कोऱ्हाळ परिसरातील सर्वांचे परिचित व्यक्तिमत्व कै. रमेश चांगदेव पा. डांगे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे आयोजन रविवार, दिनांक २९ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. समस्त डांगे परिवार आणि कोऱ्हाळे ग्रामस्थांच्या वतीने या निमित्ताने भावपूर्ण श्रद्धांजली आणि धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त रविवारी सकाळी ठीक १०.३० वाजता संगमनेर येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अनिताताई जाधव यांच्या सुश्राव्य हरि



कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम कोऱ्हाळे येथील नांदुर्खी रोडवरील डांगे वस्ती (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे संपन्न होणार आहे.

आता सहवास नसला तरी स्मृती सुगंध देत राहील, जीवनाच्या प्रत्येक वाटेवर आठवण तुमचीच येत राहील... या भावना व्यक्त करत डांगे कुटुंबातील सर्व सदस्य आणि आप्तेष्टांनी कै. रमेश डांगे यांच्या स्मृतींना उजाळा दिला आहे.

या कीर्तन कार्यक्रमासाठी व श्रद्धांजली सभेसाठी परिसरातील सर्व नागरिकांनी, मित्रपरिवाराने आणि नातेवाईकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त डांगे पा. परिवार आणि कोऱ्हाळे ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अशोक नगर कार्यकारिणी जाहीर

माजलगाव / प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सम्राट अशोक नगर माजलगाव येथील बुद्ध विहारांमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

यावेळी ही कार्यकारिणी विजय दादा साळवे, अविनाश जावळे, राकेश दादा साळवे, ड. नंदकिशोर खळगे, सिद्धार्थ ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली असून या बैठकीस अशोक नगर येथील सामाजिक कार्यकर्ते तरुण मंडळी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती. जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आनंद शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अनिल भराटे कोषाध्यक्ष पदी रोहित भैय्या साळवे सचिव पदी सार्थक शिंदे प्रसिद्धी प्रमुख पदी पत्रकार पृथ्वीराज निर्मळ, संघटक नितीन प्रधान, सजावट प्रमुख नितीन जावळे सल्लागारपदी भारत तांगडे, बाबासाहेब सूर्यवंशी, मुंजाभाऊ वैराळे, श्रीहरी नाना भोजने, कांबळे सर, अशोक कांबळे, धोंडीराम ढालमारे, अमोल शेरकर, शत्रुघन कसबे, सिद्धार्थ खिल्लारे यांची नियुक्ती करण्यात आली असून हा जयंती उत्सव डीजे ला फाटा देत डीजे मुक्त करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून पारंपारिक वाद्याच्या स्वरूपात जयंती उत्सव मिरवणूक काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या जयंती उत्सवानिमित्त सम्राट अशोक नगर येथे सामाजिक सांस्कृतिक व प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नूतन कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रेरणादायी संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. हा जयंती उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले. या जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी चे उपस्थितांच्या वतीने अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस सचिन जावळे, प्रशिक साळवे, प्रशांत अवचार, पवन राजे शेळके, केतन क्षीरसागर, महेंद्र भाग्यवंत, विशाल पायके, सुरेश नाना क्षिरसागर, करण बापू वावळकर, नितीन गायकवाड, धम्मपाल देशमाने, पियुष निर्मळ, सुरेश बनसोडे, गुड्डू साळवे, विराट चांदमारे, बुद्धीराज सिरसट, मिलिंद शिंदे, रतन राऊत, राजू मोगरेकर, आकाश भद्रे, सौरभ सिरसट, विवेक जाधव, संतोष क्षिरसागर, विजय वैराळे, प्रणव मोरे आदींची उपस्थिती होती.




**अध्यक्षपदी आनंद शिंदे, उपाध्यक्षपदी अनिल भराटे तर कोषाध्यक्षपदी रोहित भैय्या साळवे यांची निवड
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन**

# महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा महासंग्राम शनिवारपासून सोलापूरनगरीत!

सोलापूर (प्रतिनिधी)

सोलापूर येथे सिध्दाराम साखरे यांच्या स्मरणार्थ निर्झरा केअर फाऊंडेशनच्या यजमानपदाखाली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातर्फे २८ आणि २९ मार्चला होणाऱ्या चौथ्या वरिष्ठ गट महिला महाराष्ट्र केसरी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या महासंग्रामासाठी सोलापूरनगरी सज्ज झाली आहे. हा प्रतिष्ठेचा किताब जिंकण्यासाठी अपेक्षा पाटील, अमृता पुजारी, सृष्टी भोसले, सोनाली मंडलिक, ऋतुजा बिल्ले, ज्योती यादव, सिद्धी होळकर, रोशनी बोडके, ऋतुजा पवार, श्रद्धा काशिद या कुस्तीपटू कडवी दावेदारी करतील. याचप्रमाणे प्रतीक्षा बागडी (सांगली), वेदिका सासणे, अंकिता फातले (दोघी कोल्हापूर) आणि कामिनी देवीकर (अहिल्यानगर) यांना थेट प्रवेशिका (वाइल्ड कार्ड) देण्यात आल्या आहेत. ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फंडच्या अनुपस्थितीत गतउपविजेत्या अमृता पुजारीने अपेक्षा उंचावल्या आहेत.

महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील विजेत्या कुस्तीपटूला 'महाराष्ट्र केसरी' किताब, मानाची चांदीची गदा आणि किया सोनेट कार देऊन गौरवण्यात येणार आहे, तर उपविजेत्या कुस्तीपटूला बुलेट दुचाकी दिली जाईल. याशिवाय प्रत्येक गटातील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूला ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस मिळेल. या स्पर्धेत ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ३५०हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत, अशी माहिती निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील सिद्धेश्वर पेठ परिसरात असलेल्या हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा होणार आहे. मॅटवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी ५० किलो, ५३ किलो, ५५ किलो, ५७ किलो, ५९ किलो, ६२ किलो, ६५ किलो, ६८ किलो, ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके दिली जाणार आहेत.

या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ प्रमुख पाहुणे असतील. याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, सरचिटणीस योगेश दोडके आणि जिल्हाध्यक्ष अस्लम काझी यांच्यासह राज्य कुस्तीगीर संघाचे पदाधिकारी उपस्थित राहतील.

या स्पर्धेसाठी निर्झरा केअर फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही पूर्णपणे सज्ज झालो आहोत. या स्पर्धेसाठी दोन मॅट्स, वजन चाचणी, निवास, भोजन, आदी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे, असे स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी सांगितले.

स्वाती यांचे वडील सिद्धाराम साखरे हे स्वतः ज्येष्ठ कुस्तीपटू, पोलीस अधिकारी व समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनची २०२३ मध्ये स्थापना केली.




# रिपब्लिकन सेनेची जिल्हास्तरीय संवाद बैठक २९ मार्चला बीडमध्ये

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांचा सत्कार समारंभ

माजलगाव (प्रतिनिधी)

रिपब्लिकन सेनेच्या संघटनात्मक बांधणीस नवी दिशा देण्यासाठी जिल्हास्तरीय व्यापक संवाद बैठकीचे आयोजन येत्या रविवार, २९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहात करण्यात आले आहे. या बैठकीचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे नेते विजय साळवे करणार असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे.




रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुका कार्यकारिण्या बरखास्त करून पक्षबांधणीला गती दिली आहे. त्याच पार्श्वभूमीवर डॉ. सुशील सूर्यवंशी यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, या निर्णयामुळे पक्षाला नवचैतन्य मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या बैठकीत बीड जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून, नूतन प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांचा जिल्ह्याच्या वतीने सत्कारही केला जाणार आहे. परळी, अंबाजोगाई, केज, गेवराई, माजलगाव, शिरूर, धारूर आदी सर्व तालुक्यांतील इच्छुक पदाधिकारी व आंबेडकर घराण्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

रिपब्लिकन सेनेचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर मजबूत करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात असून, बीडपासून पक्षबांधणीच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर प्रस्तावित नवीन रेल्वे मार्गाचा सर्व्हे जलदगतीने करणार - जिल्हाधिकारी

बीड (प्रतिनिधी)

भारत सरकारच्या विकास धोरणानुसार, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर यांना जोडणारा नवीन रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. हा प्रकल्प प्रादेशिक आणि आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. यासाठी प्रशासकीय स्तरावर सर्वे करण्याचे काम सर्व विभागाने जलद गतीने करावे अशा स्पष्ट सूचना बैठकीमध्ये जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत.

या मार्गामुळे स्थानिक नागरिकांना जलद आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध होईल, औद्योगिक व व्यावसायिक कनेक्टिव्हिटी सुधारेल, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. शिक्षण, आरोग्य सुविधा आणि सामाजिक विकासासाठी ग्रामीण व शहर भागांमध्ये सुलभ संपर्क सुनिश्चित होईल.



सदर प्रकल्पाच्या सर्व्हेच्या अनुषंगाने दिनांक २७.०३.२०२६ रोजी जिल्हाधिकारी महोदय बीड यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस रेल्वे विभागाचे अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.

प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी बीड जिल्ह्यातील केज, बीड व गेवराई तालुक्यातील काही गावांमधील खाजगी जमीन संपादित होणार आहे. तसेच प्रस्तावित रेल्वे मार्गावर काही ठिकाणी वनविभागाची जमीन आहे, काही ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग व कॅनॉल मध्ये संपादित होणाऱ्या क्षेत्राचा समावेश आहे. त्याबाबत सर्व विभागांच्या ना हरकत प्रमाणपत्र संबंधाने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित यंत्रणा व रेल्वे विभाग यांनी एकत्रित टीम तयार करून प्रस्तावित रेल्वे मार्गाचा सर्व्हे करण्याच्या जिल्हाधिकारी महोदयांनी बैठकीत सूचना दिल्या.

# ना. पंकजाताई मुंडेंसह नाथऱ्यात लेकींच्या मांदियाळीत संपन्न झाला श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह



परळी (प्रतिनिधी)

नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. इथल्या मातीने विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे दिग्गज दिले आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासारखा लोकनेता नाथऱ्याने देशाला दिला. नाथऱ्याच्या लेकी आज सन्मानाने आणि अभिमानाने एकत्र आल्या आहेत. अध्यात्माची गोडी वाढवणारा हा सोहळा लेकींनी आयोजित करून एकजुटीची भावना वाढीस लावली असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले.

नाथरा येथे विविध गावात सासरी गेलेल्या लेकींनी एकत्रित येऊन श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह आयोजित केला होता. कथेच्या सांगता सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे उपस्थित होते. याप्रसंगी स्वररत्न ह.भ.प अंजलीताई केंद्रे यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन संपन्न झाले, ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे श्रवण करून उपस्थित भाविकांशी संवाद साधला.श्रीमद देवी कथेला लेकींचा विशेष मान असतो, आज कथेच्या निमित्ताने नाथऱ्याच्या लेकी सन्मानाने आणि अभिमानाने इथे एकत्र आल्या आहेत. लेकींचा सन्मान करण्याची आपली संस्कृती यानिमित्ताने वृद्धिंगत होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील चैत्र नवरात्रेनिमित्त कन्या पूजन करतात. मध्य प्रदेश मध्ये शिवराजसिंह चौहान अत्यंत आदरपूर्वक लेकींचे कन्या पूजन करतात, यातून लेकींचा सन्मान होतो असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या. आज या कथेच्या माध्यमातून अत्यंत सुंदर सोहळा पार पडतो आहे. यानिमित्ताने मला सर्वांशी संवाद साधता आला. नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब, पंडित अण्णा मुंडे, धनंजय मुंडे,डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेते आपल्या नाथऱ्याने दिले असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यात्म आणि एकजुटीची भावना वाढीस लावणारा हा सोहळा होता, आयोजक लेकींचे मनापासून आभार मानत ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांचे यश, कीर्ती आणि आरोग्यासाठी प्रार्थना करते म्हणतं त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सांगता सोहळ्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्व महिला भगिनींसोबत पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला.

# परळीत ना. पंकजाताई मुंडे यांचा हाऊसफुल्ल 'जनता दरबार'

जनतेच्या समस्यांचा तात्काळ निपटारा ; प्रशासनाला दिल्या जागेवर सूचना

परळी (प्रतिनिधी)

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे 'जनता दरबार' आयोजित केला होता. या जनता दरबारात परळी मतदारसंघ व तालुक्यातील आलेल्या शेकडो नागरिकांच्या समस्या त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतल्या आणि अनेक प्रलंबित कामांना तात्काळ मार्गी लावले. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला. जनतेचे प्रश्न सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. सामान्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.



नागरिक सुखावले

आपल्या लाडक्या नेत्या थेट जनतेत मिसळून संवाद साधत असल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं आणि कामाचा शब्द दिला, आता आमचा प्रश्न सुटेल,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# अंबाजोगाईत ३१ मार्च रोजी रिपाइं कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा - आयोजक

बीड / प्रतिनिधी

बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व गायरान धारकांचे अंबाजोगाई तालुक्यातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी गायरान धारकांच्या विविध प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी युवा रिपाई प्रदेश अध्यक्ष तथा रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक ३१ मार्च २०२६ मंगळवार रोजी राघव फंक्शन हॉल बस डेपो समोर अंबाजोगाई येथे दुपारी साडेबारा वाजता भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे.



या मेळाव्यास राजू जोगदंड, सचिनभाऊ कागदे, दीपक कांबळे (केज तालुकाध्यक्ष),दीपक कांबळे (अंबाजोगाई), दशरथ सोनवणे, कपिल कागदे, राणीताई गायकवाड, राहुल गंडले, विलास वाघमारे, मधुकर कसबे, कोमल मस्के, करण साळवे, उमेश बचाटे, भाऊ कोरडे, यशवंत पट्टेकर, राहुल जोगदंड, गणेश कसबे, किरण खंडागळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

अंबाजोगाई तालुक्यातील गायरान धारकांना सरसकट सातबारा देण्यात यावा, अंबाजोगाई तालुक्यातील नावे झालेल्या गायरान जमिनीची नोंद वर्ग एकमध्ये करण्यात यावी, अंबाजोगाई तालुक्यातील गायरान-गावठाण वस्ती मधील घरकुल धारकांना मालकी हक्काचा पीटीआर देण्यात यावा, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात यावी, अंबाजोगाई तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात महिला स्वावलंबी योजना सुरू करण्यात यावी आदी मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशअध्यक्ष पप्पू कागदे यांच्या उपस्थितीत अंबाजोगाई शहरात आयोजित रिपाइं कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यास अंबाजोगाई तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते महिला,गायरान धारक, घरकुल धारक यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भव्य मेळाव्याचे आयोजक तथा रिपाइंचे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष प्रमोद दासूद, शितलताई मस्के, नीताताई गायकवाड, शितलताई गायकवाड, शोभाताई बनसोडे, शांताताई कांडुके, सुरेखाताई इंगळे, मयूर दासूद, विकास सुरवसे, सुरेश कांबळे, गणेश टेकाळे, सोमेश्वर गंडले, सागर ओगले, विकास जोगदंड, सुरज गव्हाणे, बंडू कांबळे, महादेव कासिकर आदींनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER, PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).

# वाळुंज येथे सुप्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या अध्यक्षतेखाली बालकवींचे दिमाखदार काव्यसंमेलन संपन्न

## बालाघाटची गाणी काव्यसंग्रहाचे नवोदित कवींना वितरण

आष्टी - (राजेंद्र लाड) वाळुंज ता. आष्टी येथे शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन - २०२५ अंतर्गत व डॉ. हरिश्चंद्र हातवटे यांच्या फेलोशिप संदर्भात आयोजित करण्यात आलेले बालसाहित्य संमेलन अत्यंत उत्साहपूर्ण, ज्ञानवर्धक आणि सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाले. या संमेलनात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे विविध उपक्रम, साहित्यिक सत्रे, कथा-कविता वाचन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत पाहायला मिळाली. आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे दि. २३ मार्च रोजी मुकुंदराज साहित्य नगरी च्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेले बालकवी काव्यसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारा हा उपक्रम ठरला.

कवीसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी अभ्यासक्रमातील सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांची उपस्थिती होती. त्यांनी एक गाव पाण्यासाठी चंद्रावर गेले या बालकवीतेने कवीसंमेलनाला सुरुवात केली. कवीसंमेलनासाठी निमंत्रित कवी म्हणून वेदिका खेडकर, वैष्णवी शिंदे, संध्या गावडे, स्वरा आंधळे, अपूर्वा झगडे, धनश्री धस, शिवानी सोले, हर्षा जगताप, अक्षय म्हस्के, संस्कृती वाळके, तृप्ती वाल्हेकर, गाथा भादवे, मयुरी भोगाडे, स्नेहल हुंदाडे, स्नेहल धस, प्रज्ञा खाडे, प्राची सातपुते, सानिका खाडे, श्रावणी सोले, जयदत्त चौधरी, ज्ञानेश्वरी पठाडे, कृष्णा तावरे, चंचल चव्हाण, सार्थक गायकवाड, अनुजा गाडे, कृष्णा बळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी श्रीम. काझी शबनम यांनी व निमंत्रित कवींनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. या सत्राचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी हरिश्चंद्र हातवटे यांनी केले व आभार आदर्श शिक्षक सचिन वारंगुळे यांनी मानले. यावेळी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून साहित्याची आवड निर्माण होणे किती महत्त्वाचे आहे यावर आपल्या मनोगतात भर दिला. कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती मनातील भावनांची सर्जनशील अभिव्यक्ती आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड प्रतिभा दडलेली असून अशा उपक्रमांमुळे ती उजेडात येते, असेही ते म्हणाले.



या काव्यसंमेलनात आष्टी तालुक्यातील विविध शाळेतील एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी निसर्ग, पर्यावरण, आई-वडील, शिक्षण, समाजातील बदल, मैत्री, संस्कार अशा विविध विषयांवर कविता सादर केल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या वेगळ्या शैलीत आणि आत्मविश्वासाने कविता सादर करत उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी विनोदी शैलीत कविता सादर करून वातावरण हलकेफुलके केले, तर काहींनी भावनिक कविता सादर करून प्रेक्षकांना अंतर्मुख केले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरली ती एका विद्यार्थिनीने सादर केलेली भाजीपाल्याची पाटी या विषयावर आधारित साभिनय कविता. पारंपरिक वेशभूषा परिधान करून आणि हातात भाजीपाल्याची टोपली घेऊन केलेल्या तिच्या सादरीकरणाने उपस्थितांकडून जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. तिच्या अभिनयकौशल्याने आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली.

या प्रसंगी बालाघाटची गाणी या बालकवितासंग्रहाचे नवोदित बालकवींना वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढण्यास आणि नव्या पिढीला साहित्याशी जोडण्यास मदत होईल, असे मत शिक्षक व पालकांनी व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणांचे विशेष कौतुक करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव दिला. तसेच पालकांनीही आपल्या मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. या काव्यसंमेलनाला सौ. प्राजक्ताताई सुरेश धस, अभ्यासक्रमातील सुप्रसिद्ध कवी कैलास दौंड, हनुमंत चांदगुडे, शंकर कसबे व प्रमुख मान्यवर तसेच परिसरातील शिक्षक, पालक, साहित्यप्रेमी व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. एकूणच, वाळुंज येथे आयोजित करण्यात आलेले हे बालकवी काव्यसंमेलन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांच्या सर्जनशीलतेला योग्य दिशा मिळत असल्याचे दिसून आले. भविष्यातही अशा साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करून नवोदित कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

# कापशी फाट्याजवळ भीषण अपघात ;डंपरच्या धडकेत कार पेटली - माय- लेकराचा जागीच मृत्यू

आष्टी - (प्रतिनिधी)

आष्टी-डोईठाण-अंमळनेर मार्गावर कापशी फाट्याजवळ शुक्रवारी (दि. २७ मार्च) सकाळी एक अत्यंत भीषण अपघात घडून माय-लेकराचा दुर्दैवी मृत्यू झाला. खडीने भरलेल्या डंपर आणि स्विफ्ट डिझायर कार यांच्यात समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेनंतर कारने अचानक पेट घेतला. आगीच्या भीषण ज्वाळांमध्ये अडकून दोघांचा



जागीच होरपळून मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या अपघातात सौ. पुष्पा श्रीहरी पुरी (वय ५०) आणि त्यांचा मुलगा ऋषिकेश श्रीहरी पुरी (वय २६) यांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यात ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले ह.भ.प. श्रीहरी पुरी यांचे मूळ गाव साळेगाव (ता. केज) आहे. शुक्रवारी सकाळी त्यांच्या कुटुंबातील पाहुण्यांच्या १३ व्या विधीसाठी सौ. पुष्पा पुरी आणि त्यांचा मुलगा ऋषिकेश हे स्विफ्ट डिझायर कारने गावी जात होते. आष्टी-डोईठाण-अंमळनेर मार्गे बीडकडे जात असताना कापशी फाट्याजवळ त्यांच्यावर हा काळाचा घाला कोसळला. समोरून येणाऱ्या खडीने भरलेल्या टिप्पर (क्र. एम-१६ सीडी- ७३०५) ने त्यांच्या कारला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारने क्षणार्धात पेट घेतला. आगीचे रौद्र रूप धारण झाल्याने कारमधील दोघांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व प्रवाशांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी गाडीत अडकलेल्या माय-लेकरांना वाचविण्याचे प्रयत्न केले, मात्र आगीच्या तीव्रतेमुळे त्यांना यश आले नाही. अखेर दोघांचाही जागीच दुर्दैवी अंत झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. पुढील पंचनामा व तपासाची कार्यवाही सुरू आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे पुरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. एका क्षणात हसतंखेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



माजलगाव (प्रतिनिधी)

निपाणी टाकळी येथे ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले या कार्यक्रमाला प्राध्यापक डॉक्टर श्रीकांत येळेगावकर मार्गदर्शक फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर, प्राध्यापक डॉक्टर एन बी तेली चेअर पर्सन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर, श्री सुगत रत्न गायकवाड फिल्ड कॉर्डिनेटर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर, एन एस एल शुगर पवारवाडी युनिट नंबर तीन चे मूर्ती साहेब एमडी, देवाप्पा जोगरे एच आर मॅनेजर, यासीन सरकार जूनियर एच आर मॅनेजर, केन विभाग दत्तात्रय आहेरकर साहेब ए जी एम यांचे मार्गदर्शनाखाली ऊसतोड महिला साठी कॅम्प घेण्यात आला डॉक्टर आशिया मॅडम सी एच ओ खरात आडगाव यांनी ऊसतोड मजुरांची महिलांची तपासणी केली औषध पाणी देऊन आरोग्य विषयक सल्ला दिला या कार्यक्रमाला आशा वर्कर अंगणवाडी मदतनीस कारखान्यातील वसंत चव्हाण साहेब यांनी सहकार्य केले श्री पाटील साहेब, चौरे मॅडम यांनी सर्वांचे स्वागत केले ३३ महिला पुरुषां ची आरोग्य शिबिरा साठी सहभाग नोंदविला श्री शेख शहाबुद्दीन यांनी सर्वांच्या आभार मानले

# शाब्बास पोरी! ऊसतोड मजुराच्या लेकीची जिद्द फळाला ;कोमल नागरगोजे अकोला पोलिस दलात भरती

आष्टी - (राजेंद्र लाड)

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, याचे जिवंत उदाहरण तालुक्यातील क-हेवडगाव येथील कोमल लक्ष्मण नागरगोजे हिने घडवून दाखवले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाट काढत ऊसतोड मजुराच्या मुलीने थेट अकोला पोलिस दलात भरारी घेतली असून, तिच्या या यशामुळे संपूर्ण गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



कोमल ही एका सामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलगी. आई मंदाबाई आणि वडील लक्ष्मण नागरगोजे हे ऊसतोड व रोजंदारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरात शिक्षणाचा वारसा नसतानाही आणि अत्यंत मर्यादित साधनसामग्रीत कोमलने शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव असल्याने तिने शाळेसोबत ऊसतोडीच्या कामातही हातभार लावला.

घरची गरिबी, शिक्षणासाठी अपुऱ्या सुविधा, ग्रामीण भागातील अडचणी या सगळ्यांवर मात करत कोमलने पोलिस होण्याचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नासाठी तिने स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. दररोज पहाटे उठून धावणे, व्यायाम, शारीरिक चाचण्यांचा सराव आणि अभ्यास यांचा समतोल साधत ती सातत्याने प्रयत्न करत राहिली.

मागील एका भरती प्रक्रियेत अत्यंत थोडक्यात संधी हुकल्याने ती खचली नाही. उलट मी पोलिस होणारच हा निर्धार अधिक बळकट करत तिने नव्या जोमाने तयारी सुरू ठेवली. आर्थिक अडचणीमुळे शहरात राहून क्लासेस करणे शक्य नसतानाही, थोड्या दिवसांच्या मार्गदर्शनानंतर तिने घरीच अभ्यास सुरू ठेवला. अखेर तिच्या चिकाटीला यश मिळाले आणि २५ मार्च रोजी जाहीर झालेल्या निकालात तिची अकोला पोलिस दलात निवड झाली.

कोमलच्या या यशामुळे तिच्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले असून, त्यांनी आनंद व्यक्त करत आमच्या जन्माचं सार्थक झलं, अशी भावनिक प्रतिक्रिया दिली. गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी, माजी व विद्यमान सरपंच, सदस्य, सेवा सोसायटीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी तिचे कौतुक रत अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. कोमलचे वडील लक्ष्मण नागरगोजे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही मलीच्या शिक्षणासाठी धीही तडजोड केली नाही. आर्थिक ओढाताण असतानाही त्यांनी पोटाला चिमटा घेऊन तिच्या शिक्षणाचा व पोलिस भरतीच्या तयारीचा खर्च उचलला. आज मुलीच्या शाने त्यांच्या कष्टाचे चीज झाले आहे. कोमलने दररोज पहाटे सराव, धावणे, गोळाफेक, लांब उडी अशा शारीरिक चचण्यांची तयारी आणि भ्यास यांचा संगम साधला. तिच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच तिने अकोला पोलिस दलात स्थान मिळवले. कोमलच्या यशामुळे क-हेवडगाव व परिसरातआनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकऱ्यांनी तिचा सत्कार करून अभिमान व्यक्तकेला असून, तिची यशोगाथा इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी येथील विद्यार्थिनींचा भव्य सत्कार समारंभ सोहळा संपन्न

## थ्रो बॉल,सांस्कृतिक गीत व बालसाहित्य क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव

आष्टी - (राजेंद्र लाड) पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीम. सुजाता झगडे या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून वाय. आर. गर्जे, बन्सी बापू मोरे, अरुण कांबळे, लक्ष्मण रेडेकर, डॉ. नदीम शेख, श्रीम. अश्विनी घालमे, श्रीम. अनिता लांबडे, कु. नम्रता पवार, कु. जैनब शेख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यानंतर क्रीडा शिक्षक संजय भोकरे व सांस्कृतिक विभाग प्रमुख सुरेश नरोड यांनी कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक केले.





यानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने गुरुवार दि. २६ मार्च २०२६ रोजी बीड येथे आयोजित १४ वर्षांखालील थ्रो बॉल स्पर्धेत बीड जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनी स्वराली सोले, अस्मिता भवर, तेजस्विनी मोरे, सृष्टी कदम, तेजश्री रेडेकर, सृष्टी रोकडे, हुदा शेख, स्नेहा धोंडे, सारा शेख, संस्कृती झगडे, आलिया पठाण, तनुजा काळे यांचा गुलाबपुष्प व जलपानासाठी बाटली भेटस्वरूप देण्यात येवून सन्मान करण्यात आला. तसेच १७ वर्षांखालील थ्रो बॉल स्पर्धेत बीड जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या गौरी भोगाडे, प्रांजल जाधव, अनुराधा सुळे, ऋतुजा काळे, सायली धनवडे, समृद्धी डोमकावळे, शिवानी मुळे, समृद्धी जगताप, प्राजक्ता तोडकर, दिव्या शिंदे, भक्ती भिसे, दिव्या केरूळकर या विद्यार्थिनींचाही गुलाबपुष्प व जलपानासाठी बाटली भेटस्वरूप देण्यात येवून प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. या सर्व विद्यार्थिनींनी क्रीडा शिक्षक संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली यश मिळविले असून त्यांना श्रीम. उषा जगताप यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडा अधिकारी अविनाश पाटील, सतिष राठोड व अनिकेत काळे यांनी यांनी अभिनंदन केले.

याचबरोबर प्रजासत्ताक दिनी सादर केलेल्या जहाँ डाल डाल पर सोने की चिड़िया...या देशभक्तीपर गीतातील विद्यार्थिनी अंकिता राठोड, ऋतुजा धाराशिवकर, ऋतुजा सायकड, तनुजा माने, प्रणाली आजबे, प्रतिक्षा गुजर, चंचल चव्हाण, अश्विनी पोकळे, भाग्यश्री धोंडे, सायली भोगाडे, अरबीना सय्यद, प्रिया परिवार, सुमैय्या शेख, अनुराधा सुळे, श्रेया सुळे, प्रांजल जाधव, प्रतिक्षा पवार, प्रगती मुटकुळे, सुहानी कांबळे, भक्ती भिसे, समृद्धी जगताप, अश्विनी शेंदूरकर, कोमल पाखरे, वैष्णवी पारखे, गौरी कदम, पूर्वा एकशिंगे, श्रेया गायकवाड, श्रेया जंपलवार, अस्मिता जगताप, अक्षरा रासकर यांना सांस्कृतिक विभागाच्या वतीने सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थिनींना सुरेश नरोड, श्रीम. शोभना सातव, श्रीम. सुनिता पोकळे व श्रीम. कोमल थेटे यांचे मार्गदर्शन लाभले. विशेष बाब म्हणजे शाळा व्यवस्थापन समितीच्या आर्थिक सहकार्याने विद्यार्थीनींना जलपानासाठी बाटली भेटस्वरूप देण्यात आली.

तसेच वाळुंज येथील बालसाहित्य संमेलनात कथाकथन स्पर्धेत सहभाग घेतल्याबद्दल प्रतिक्षा पवार व काव्यवाचनासाठी चंचल चव्हाण यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. या विद्यार्थिनींना आप्पासाहेब काळे व राजेंद्र लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

समारंभात श्रीम. आशा शिंदे, लक्ष्मण रेडेकर, डॉ. नदीम शेख व श्रीम. सुजाता झगडे यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थिनींच्या यशाचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन देविदास शिंदे यांनी केले, तर आभार आप्पासाहेब काळे यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आष्टी विधानसभा प्रमुखपदी गणेश शिंदे ;भाजपकडून महत्त्वाची जबाबदारी सोपवली

आष्टी - (प्रतिनिधी)

भारतीय जनता पक्षाच्या आष्टी विधानसभा प्रमुखपदी गणेश शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून, पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण निवड मानली जात आहे. त्यांच्या साधेपणा, प्रभावी जनसंपर्क आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेमुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर विश्वास दर्शवत ही जबाबदारी सोपवली आहे.



पक्षाच्या एस.आय.आर. अभियानांतर्गत मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणासाठी शिंदे यांची बी.एल.ए. वन म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे. या भूमिकेतून ते आष्टी विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण, दुरुस्ती व अद्ययावत प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडणार आहेत. या कामामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व अचूकता राखण्यास मदत होणार आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रात शिंदे यांच्या कार्यक्षमतेचा व अनुभवाचा उल्लेख करत, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. कार्यकर्त्यांशी असलेला जवळचा संपर्क आणि संघटन कौशल्य यामुळे शिंदे यांची निवड योग्य ठरेल, असे मतही व्यक्त करण्यात आले आहे.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधून पुढे आलेल्या गणेश शिंदे यांच्या निवडीमुळे आष्टी तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तळागाळातील कार्यकर्त्यांना नवे बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

आपल्या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना गणेश शिंदे म्हणाले, पक्षाने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाची जाणीव आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटना अधिक सक्षम करण्यासाठी मी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करेन.

तसेच त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. गणेश शिंदे यांच्या या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, त्यांच्या पुढील राजकीय व संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बीड जिल्हा कोषागार कार्यालय आणि बँका ३१ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार


बीड (प्रतिनिधी)

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी यांनी महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. त्यानुसार, जिल्ह्यातील सर्व कोषागार कार्यालये आणि शासकीय व्यवहार करणाऱ्या बँका ३१ मार्च रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत सुरू राहतील.

बीड जिल्हा कोषागार कार्यालय, त्यांतर्गत असलेली सर्व उपकोषागार कार्यालये आणि भारतीय स्टेट बँक (डइख) सह इतर सर्व शासकीय व्यवहार हाताळणाऱ्या बँकांच्या शाखा ३१ मार्च २०२६ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत.जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी (ऊऊज) आपली देयके अचूकपणे आणि कार्यालयीन वेळेत सादर करावीत, जेणेकरून ३१ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत त्यावर कार्यवाही पूर्ण करता येईल.

आर्थिक वर्षपूर्ती: सन २०२५-२६ चे आर्थिक व्यवहार बंद करून नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ चे कामकाज वेळेवर सुरू व्हावे, या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे.जिल्हा कोषागार अधिकारी, लहू पांडुरंग गळगुंडे यांनी ही माहिती दिली असून सर्व संबंधित विभागांनी या बदलाची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे.

# नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष पदी अनिल पाटील धमने यांची निवड



नांदेड (प्रतिनिधी)

नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन छढड- विद्यार्थी संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष पदी अनिल पाटील धमने यांची निवड .अनिल पाटील धमने हे गेल्या २८ वर्षा पासून विविध पक्ष संघटनेत सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असून त्यांना सर्व क्षेत्रातील दांडगा अनुभव असल्या मुळे त्याच्या आजवर केलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन छढड- संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हिटलर भोसले यांच्या आदेशानुसार त्यांच्या सही निशी प्रदेशाध्यक्ष भास्कर हंबर्डे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे . अनिल पाटील धमने हे १९९८ पासून शिवसेना . भाजपा . राष्ट्रवादी कॉग्रेस . महात्मा फुले समता परिषद या सह ओबीसी संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व शिवसेना ओबीसी निवड समिती सदस्य म्हणून तर ते सध्या विद्यमान शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख तर व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघ मुख्य सचिव या पदावर कार्यरत काम करीत असून त्यांना शासकीय . शैक्षणिक . सामाजिक . राजकीय .क्षेत्रातील कामाचा मोठा अनुभव पाहता त्यांनी आजवर केलेल्या कार्याची दखल घेऊन नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन छढड- संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हिटलर भोसले यांच्या आदेशाने

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भास्कर हंबर्डे यांनी दि २७ मार्च रोजी एका छोटे खानी कार्यक्रमात हॉटेल आकृती जुना कौठा नांदेड येथे अनिल पाटील धमने यांची निवड करण्यात आली यावेळी मराठवाडा अध्यक्ष शंकर धिरडीकर मराठवाडा कायदेशिर सल्लागार ड चंद्रप्रकाश सांगवीकर . नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिलानंद सोनकांबळे . नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष पदी राम पाटील मुदखेडे आंदीची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली .

या नियुक्ती पत्रात

शैक्षणिक अडचणी दुर करण्यासाठी काम करणे, तसेच हे पुर्णपणे सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतीक, औध्योगीक व क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणारे संघटन असून, सर्व समाजातील विद्यार्थ्यांचा कल हा उद्योजकते कडे वळला पाहिजे असा सामाजिक विचार करून संघटन निर्माण करणे व त्याची बांधनी ही एक राजकीय चळवळ नसुन विद्यार्थी संगोपन व विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने काम करणारी संघटना आहे.

तसेच बेरोजगारांना रोजगार मिळवुण देणे व भटक्या विमुक्त जाती मागासवर्गीय, बहुजन समस्त बांधवांना शैक्षणिक न्याय मिळवून देण्यासाठी या संघटनेचे मुख्य उध्दीष्ट असतील असे नियुक्ती पत्रात नमुद केले आहे

या निवडी बद्दल सामाजिक राजकीय शासकीय आदी सह मित्र मंडळिंनी अनिल पाटील धमने यांच्यावर अभिनंदना चा वर्षाव केला जात आहे .

# नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा अतिरिक्त साठा टाळावा - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## पेट्रोलपंपधारकांची बैठक; जिल्ह्यात पुरेसा इंधन साठा उपलब्ध असल्याची माहिती



नांदेड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल व डिझेलची पॅनिक खरेदी करू नये तसेच अतिरिक्त साठा करणे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंपधारकांची बैठक पार पडली.

या बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड तसेच विविध पेट्रोलपंप मालक उपस्थित होते. यावेळी पेट्रोलपंपधारकांनी मांडलेल्या अडचणींचे निराकरण करण्यात आले.जिल्ह्यासाठी आवश्यक असलेला पेट्रोल व डिझेलचा साठा पर्याप्त प्रमाणात राखण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच कोणत्याही परिस्थितीत साठाबाजी किंवा चढ्या दराने विक्री होणार नाही, याबाबत कडक सूचना देण्यात आल्या.

पेट्रोलपंपधारकांच्या सूचनेनुसार रविवारी तेल डेपो सुरू ठेवणे तसेच मागणीनुसार इंधन उपलब्ध करून देण्याबाबत तेल कंपन्यांना सूचना करण्यात आल्या. पेट्रोलपंपांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याच्या सूचना अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांना देण्यात आल्या.जिल्ह्यातील उपलब्ध साठ्याचा आढावा घेतला असता, दैनंदिन गरजेनुसार पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिली.



# लोह्यात पेट्रोल-डिझेलसाठी पंपांवर गर्दी

## तुटवड्याच्या अफवेने नागरिकांमध्ये धावपळ; वाहनांच्या लांबच लांब रांगा

लोहा (प्रतिनिधी)

लोहा तालुक्यात पेट्रोल व डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याची अफवा पसरताच शहरासह परिसरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठी गर्दी केली. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे दुचाकींसह चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

अफवेमुळे घाबरलेल्या नागरिकांनी आवश्यकतेपेक्षा अधिक इंधन भरण्याचा प्रयत्न केल्याने पंपांवर ताण वाढला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पंप चालकांना पोलिसांची मदत घ्यावी लागली. काही ठिकाणी पोलिसांच्या उपस्थितीत इंधन वितरण सुरळीत सुरू ठेवण्यात आले.दरम्यान, पेट्रोल-डिझेलप्रमाणेच घरगुती गॅससाठीही रांगा लागण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे नागरिकांना कोरोना काळातील निर्बंध व नोटबंदीच्या काळातील परिस्थितीची आठवण झाली. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे सर्वसामान्यांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे.याबाबत प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. इंधनाचा कोणताही तुटवडा नसून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच अनावश्यक साठेबाजी टाळून आवश्यकतेनुसारच इंधन घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.एकूणच, अफवेमुळे निर्माण झालेल्या या गोंधळामुळे लोहा शहरातील दैनंदिन जीवनावर काही काळ परिणाम झाला आहे.

# नांदेड महापालिकेच्या लेखा व वित्त विभागास आय.एस.ओ मानांकन प्राप्त



नांदेड (प्रतिनिधी)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणि गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल यशस्वी झाले असून, महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाला (-लर्लेीपीी ऋळपरपलश ऊशरिीींशपीं) प्रतिष्ठित खडज ९००१:२०१५ हे जागतिक दर्जाचे मानांकन प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांचे अचूक व्यवस्थापन, पारदर्शक कार्यपद्धती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या जलद सेवांची दखल घेऊन हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने महापालिकेच्या तिसाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधुन त्याचप्रमाणे १०० दिवसांचा कृती आराखडा दृष्टीपथात ठेवुन या नामांकनाच्या अनुषंगाने लेखा विभागात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महपौर सौ.कविता संतोष मुळे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला बालकल्याण सभापती सदिच्छा पाटील,पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे,अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार,उपायुक्त अभिजित वायकोस, स.अजितपालसिंघ संधु,नितीन गाढवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांच्यासह पालिकेच्या इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

लेखा विभागातील कार्यालयीन रचना,झिरो पेंडन्सी अर्थात फाईल्सचा निपटारा,सहा गठ्ठे पध्दती,अभिलेखाचे वर्गीकरण, ई-ऑफिस, अत्याधुनिक अभिलेख कक्ष आणि अद्ययावत हिशोब ठेवण्याची पध्दत एकंदरीत कामाच्या पारदर्शकतेमुळे हे यश प्राप्त झाले आहे. प्रशासकीय सुधारणा करतांना *पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे* आणि *मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे* यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील कर्मचाऱ्यांनी कार्यक्षमतेत वाढ केली आहे. डिजिटलायझेशन अंतर्गत आर्थिक कामकाजात संगणकीय प्रणालीचा प्रभावी वापर केल्याने त्रुटींचे प्रमाण कमी झाले आहे.

या प्रमाणपत्राचे विशेष महत्त्व असुन खडज ९००१:२०१५ हे मानांकन गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीसाठी दिले जाते, ज्यामुळे संस्थेची विश्वासार्हता वाढते. या यशाबद्दल महानगरपालिका प्रशासनाने आनंद व्यक्त केला असून, हे मानांकन मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. आगामी काळात महापालिकेचे इतर विभागही अशाच प्रकारे दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रयत्नशील राहतील, असा विश्वास यावेळी सर्व मान्यवरांनी व्यक्त केला आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपलेखापाल धोंडोपंत कुलकर्णी तर सूत्रसंचलन जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे यांनी केले. या नामांकन प्राप्तीसाठी लेखा वित्त विभागातील कार्यालय अधिक्षक सुजाता वाडियार,वरिष्ठ लिपिक दैवशाला येवते,गजानन रासे, सतपालसिंघ कोल्हापुरे आदिंनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# सिडको व हडको येथील श्रीराम मंदिरात राम जन्मोत्सव ऊत्साहात साजरा,अनेक ठिकाणी महाप्रसाद आयोजन





नवीन नांदेड:- श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने सिडको व हडको येथील श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते तर गुरूवार बाजार सिडको येथे ठाकूर परिवार यांच्या वतीने हभप सौ.पुरी यांनी भजन कीर्तन व महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते, यावेळी परिसरातील लोकप्रतिनिधी व विविध पक्षांचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

रामनवमी निमित्ताने सिडको येथील राममंदिर येथे श्री रामकथा दि१९ मार्च ते २५ मार्च २६ दरम्यान व्याख्याते - प्रवचनकार प्रणव जनार्दन पटवारी माजलगांव यांची आयोजित करण्यात आली होती, २३ मार्च सकाळी १० वाजता

रुद्र स्वाहाकार महायज्ञ (पौराहित्य: सुशिलगुरु) दिनांक २६ मार्च सकाळी १०ते १२श्री रामजन्म कीर्तन रामकृष्ण गोविंदराव जामकर दुपारी १२ वा.श्री रामजन्म उत्सव (पाळणा, महाआरती) सायं.६ वा.श्री रामाची शोभायात्रा (मंदिर-शिवाजी चौक श्री राममंदिर) येथे काढण्यात आली,२७ मार्च सकाळी १०.३० ते १२ लक्ष्मीकांत रवंदे याच्या संगीत विद्यालयाचे सादरीकरण 'रामधुन'

(भक्तीसंगीतावर आधारीत कार्यक्रम)

दुपारी १२ते ४ श्री रामाची आरती व महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला, यावेळी , विविध पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीते साठी नितीन जळकोटे,माधव घाणेकर,राज आडसकर, आशिष धानोरकर,बबन शिंदे,गणेश भोसकर ,मयूर लोलगे,गुरू किरण जोशी ,व सिडको राम मंदिर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

हडको येथील राम मंदिर येथे रामनवमी निमित्ताने २६ मार्च रोजी सकाळी १०.३० ते १२ लक्ष्मीकांत रवंदे याच्या संगीत विद्यालयाचे सादरीकरण' रामधुन'

(भक्तीसंगीतावर आधारीत कार्यक्रम)

दुपारी १२ बाजता रामजन्म व श्री रामाची आरती व महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला , यावेळी भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, यांच्या सह लोकप्रतिनिधी व मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी हडको राममंदिर युवा विश्वस्त मंडळ अध्यक्ष विनायक जोशी ,गणेश जाधव ,संतोष गुट्टे, मलीकार्जुन नमोसे, मारोती कोल्हे, पांडुरंग शिरसाट,प्रतीक घोरबांड, गणेश रहाटकर, राहुल शिंदे,प्रशांत घोरबांड, अजय फड, शिवकीरन मुकनवार महिला मंडळ, सौ संगीता कुलथे, मेघा जोशी, वनमाला कोल्हे, रोहिणी घोरबांड, अश्विनी मुकनवार, रुपाली देशमुख, गीता रहाटकर,यांनी परिश्रम घेतले.

गुरूवार बाजार सिडको येथे ठाकूर परिवार यांच्या वतीने आयोजित श्रीराम नवमी निमित्ताने हभप सौ.पुरीबाई यांच्या भजन कीर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी महिला बालकल्याण उपसभापती सौ.निरजना लांडगे, नगरसेवक संजय पाटील घोगरे, नगरसेविका सुवर्णा सतिश बस्वदे,

पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिसरातील विविध भागातील मंदिर व अनेक ठिकाणी उत्साहात रामनवमी साजरी करण्यात आली.



# रेती लिलावात महास्कॅम? - ४ कोटींचा महसूल ४० लाखांवर

साडेतीन कोटींची लूट, बिलोलीत प्रशासनावर गंभीर आरोप....

बिलोली (प्रतिनिधी)

तालुक्यातील रेती लिलाव प्रक्रियेत अभूतपूर्व घोटाळा उघडकीस येत असल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ४ कोटी रुपयांचा अपेक्षित महसूल थेट ४० लाखांवर घसरल्याने तब्बल साडेतीन कोटी रुपयांचा संशयित गैरव्यवहार झाल्याची चर्चा रंगली आहे.

यातच धक्कादायक बाब म्हणजे, लिलाव प्रक्रियेदरम्यान डिपॉझिट रक्कम १० हजारांवरून अचानक ३ लाख रुपये करण्यात आली, ज्यामुळे सामान्य स्पर्धकांना बाहेर काढून ठराविक लोकांसाठीच मार्ग मोकळा केल्याचा आरोप होत आहे. यामागे रेती माफियाचा थेट हस्तक्षेप असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या गंभीर प्रकाराविरोधात पत्रकार राजू पाटील, रत्नाकर जाधव, शंकर मिवलगे, दिलीप घाटे आणि संजयकुमार पोवाडे यांनी थेट जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे धडक देत तक्रार दाखल केली आहे.

# केज येथील न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभाचे रविवारी आयोजन




केज/प्रतिनिधी

केज येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालय परिसरातील नवीन न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ येत्या रविवारी,दि.२९ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १०-३० वाजता हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती निमंत्रकांकडून देण्यात आली आहे.कोनशिला समारंभ कार्यक्रमाला

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राहणार उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर चंद्रकांत संत आणि माननीय न्यायमूर्ती श्री.अभय ज. मंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. तसेच,या प्रसंगी माननीय न्यायमूर्ती श्री.सिद्धेश्वर सुंदरराव ठोंबरे (मुंबई उच्च न्यायालय) यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे.प्रमुख उपस्थितीमध्ये राजस्थान ऊच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती श्री.संभाजीराव शिवाजीराव शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच नियोजन बीड चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.सुधीर बाबूराव भाजीपाले आणि केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड.महादेव संपतराव लाड यांनी काम पाहिले आहे.न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या या विस्तारीकरणामुळे केज परिसरातील पक्षकार आणि वकिलांची मोठी सोय होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्यास जास्तीत जास्त नागरिकांनी व कायदे तज्ज्ञांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे स्थळ अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,केज, असुन रविवार,दि.२९ मार्च २०२६,सकाळी १०-३० वाजता हा समारंभ संपन्न होणार आहे.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड (प्रतिनिधी)

नांदेड :- जिल्ह्यात दि २८ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते ११ एप्रिल च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २८ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते ११ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# सोलर पंप योजनेच्या नावाखाली घोटाळा; नगरमध्ये ३८ शेतकर्यांची लाखोंची फसवणूक

## बनावट ग्राहक नंबरचा वापर । आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

अहिल्यानगर ।प्रशांत बाफना

महाराष्ट्र शासनाच्या मागेल त्याला सोलर पंप योजना अंतर्गत श्रीगोंदा तालुयात फसवणुकीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तब्बल ३८ शेतकर्यांची सुमारे ५.४३ लाखांची फसवणूक झाल्याची माहिती समोर आली असून, परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी वडाळी (ता.श्रीगोंदा) येथील अविनाश भाऊसाहेब काटे यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून सोलर पंप योजनेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होती. केडगाव येथील किरण आसाराम बोरुडे यांनी स्वतःकडे सोलर पंप योजनेची एजन्सी असल्याचे सांगत संपर्क साधला. त्यांनी कोटेशन पद्धतीने अर्ज भरून त्वरित मंजुरी मिळवून देण्याचे तसेच १५ दिवसांत सोलर पंप बसवून देण्याचे आमिष दाखवले. यासाठी शासन शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कमही शेतकर्यांकडून उकळण्यात आली.विश्वास ठेवून शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात पैसे जमा केले. मात्र काही दिवसांनी सर्व अर्ज अचानक ब्लॉक झाल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

चौकशीत धक्कादायक बाबी

प्राथमिक तपासात अर्ज भरताना आधी चुकीचे ग्राहक क्रमांक वापरण्यात आल्याचे समोर आले आहे. तसेच आधीच अस्तित्वात असलेल्या ग्राहकांचे ग्राहक नंबर वापरून अर्ज सादर करण्यात आल्याचेही उघड झाले आहे. यामुळे ही फसवणूक नियोजनपूर्वक केल्याचा संशय व्यक्त होत आहे.

फसवणुकीची रक्कम नऊ लाखांहून अधिक

या प्रकरणात ३८ शेतकरी बाधित झाले असून सुमारे ५.४३ लाखांची फसवणूक झाल्याचे सांगितले जात आहे. तसेच आणखी काही शेतकर्यांचे पैसे अडकले असल्याने एकूण फसवणुकीची रक्कम ९ लाखांहून अधिक असण्याची शयता वर्तवली जात आहे. घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करा

तक्रारदारांनी संबंधित आरोपीवर तत्काळ गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करावी, तसेच सर्व बाधित शेतकर्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे. या घटनेमुळे शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. फसवणूक करणारा एजंट किरण आसाराम बोरुडे यांनी यापूर्वी अनेक तालुयांमध्ये फसवणूक केल्याचे समजत आहे. श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये त्याच्यासह सहकार्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी याची कसून चौकशी केली असता त्यांच्या हाती मोठे धागेदोरे व रॅकेट सापडू शकते, असे शेतकर्यांचे मत आहे

# रुपयाचा ऐतिहासिक घसरणीचा विक्रम; डॉलरसमोर ९४.७ वर पोहोचला

मुंबई (जिल्हा प्रतिनिधी )

भारतीय रुपयाने आज घसरणीचा नवा विक्रम नोंदवत अमेरिकन डॉलरच्या तुलनेत प्रथमच ९४.७ या पातळीवर पोहोचला. गेल्या १४ वर्षांतील ही सर्वात मोठी घसरण मानली जात असून, आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे चलनबाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे.

तज्ज्ञांच्या मते, मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या युद्धस्थितीमुळे आणि ऊर्जा पुरवठा साखळीतील अडचणींमुळे रुपयावर दबाव वाढला आहे. यामुळे जागतिक गुंतवणूकदारांनी उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसा काढून सुरक्षित गुंतवणुकीकडे वळण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः डॉलर आणि सोन्याकडे वाढलेली मागणी याचा थेट परिणाम रुपयावर झाला आहे.

मागील एका महिन्यातच रुपयाची किंमत सुमारे ४ टक्क्यांनी घसरली असून,



आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंत १० टक्क्यांहून अधिक अवमूल्यन झाले आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत सातत्याने वाढ होत राहिल्यास रुपया लवकरच ९८ च्या पातळीपर्यंत घसरण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# पुणेकरांनाही भावली शिरूरच्या खमंग ढक्कू भाकरीची चव !

## चपाती फुलक्या लाटणा-या महिलांनी थापल्या चुलीवर भाकरी !

शिरूर कासार/प्रशांत बाफना

चैत्र महिणा सुरू झाला की कासार समाजाचे कुलदैवत असलेल्या कालिका देविच्या आराधनाचे पर्व महाराष्ट्रातील सर्व शक्तिपिठावर सुरू होते , प्रतेक स्थळाचे वेगळे महात्म्य आणि वेगळा पदार्थ असतो यात शिरूर कासारच्या ढक्कू भाकरीची वेगळी चव बहुधा अन्यत्र कुठे नाही मात्र आता शिरूरच्या या ढक्कू भाकरीने पुणेकरांच्या मनात घर केले आणि कालीका देवी मंदिरात शिरूरसारखा ढक्कू आणि भाकरीचा प्रसाद होऊ लागला , मागिल वर्षाप्रमाणे याही वर्षी चपाती फुलके लाटणा-या पुणेकर महिलांनी चुलीवर भाकरी थापल्या तर ढक्कू देखील बनवला .

ढक्कू बनवण्याची पाक कला पुण्यातील महिलांनी शिरूरकडून अवगत केली , ढक्कू आणि भाकरी हा काय प्रकार याचे पुणेकरांना सुरूवातीस कुतूहल होते मात्र आता या ढक्कू भाकरीने त्याचे जिभेवर अधिराज्य गाजवले , शिरूरला जशा मानाच्या आराधना मंदिर विश्वस्तांच्या असतात अगदी त्याप्रमाणेच पुण्यातील कालिका देवी विश्वस्थ मंडळाने तो पायंडा पाडला आणि पुढे देखील त्याची वाटचाल सुरू राहवी म्हणून पांच समाजबांधवांनी आराधनाचे यजमानपद स्विकारले असल्याचे विश्वस्थ अध्यक्ष अणिल भांडेकर यांनी सांगितले .

नौकरी व्यवसाय निमित्ताने



शिरूर येथील समाज बांधवानी पुणेकराशी घट्ट नाते जोडले आणि कालिका देवीचा कुलाचार शिरूर प्रमाणेच सुरू केला त्यात आता आराधना आणि ढक्कू भाकरी चवदार पुणेकरांच्या केंद्रस्थानी राहिल्या आहेत .

शिरूरप्रमाणे निमंत्रण नाही !

आराधनाच्या प्रसादाचे जसे शिरूरला आमत्रण देण्याची प्रथा नाही अगदी तसीच प्रथा पुणेकरांनी सुरू केली ,दिलेल्या वेळेत समाजबांधव उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतात . प्रथम आराधनाचे आयोजन विश्वस्थ रमाकांत कानडे ,भास्कर अंदूरे , रंगनाथ उंडे , दिपक पाथरकर , धनंजय सातपुते , दिपक अंदूरे यांनी यशस्वीपणे पार पाडले .

सकाळी घरचे काम करून महिला मंदिरात हजर !

आराधनाच्या भाकरी करण्यासाठी महिला आवर्जुन आपले घरकाम आटोपुन सकाळी कालिका मंदिरात हजर होतात आणि घरच्या पेक्षा अधिक पटीने आनंदाने चुलीवर भाकरी तयार करतात . भोजनाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी खमंग ढक्कू भाकरीसोबत कांदा , लोणचे , कैरी आणि उनहाळ्यात थंड मठ्ठा जेवणाची ऋची वाढवतो

# मुक्तेय एका झंझावाताची अखेर कादंबरीचे थाटात प्रकाशन संपन्न

पिंपळनेर (जिल्हा प्रतिनिधी )

पांझरा काठचे शिक्षणमहर्षी कायदेतज्ज्ञ भाजपाचे जेष्ठ नेते कै. ड. संभाजीराव पगारे पिंपळनेर यांच्या जिवनावर आधारीत ज्ञानसिंधु प्रकाशन प्रकाशित, गावगाडाकार साहेबराव नंदन लिखित मुक्तेय एका झंझावाताची अखेर ह्या चरित्रात्मक कादंबरीचे पिंपळनेर ता. साक्री येथील श्री क्षेत्र मुरलीधर मंदिर देवस्थानच्या प्रांगणात देशाचे मा. सरंक्षण राज्यमंत्री मा. सुभाष भामरे यांच्या अध्यक्षते खाली त्यांच्या शुभ हस्ते अनेक मान्यवरांच्या व शेकडो रसिक वाचक समाज बांधवांच्या उपस्थितीत वार्षिक प्रथम पुण्यस्मरण सोहळ्यात थाटात प्रकाशन संपन्न झाले.

कै. ड बापूसो संभाजीराव पगारे हे महात्मा फुले यांच्या विचारांच्या प्रेरणेने भारावलेले व्यक्तिमत्त्व असले तरी ते आर. एस. एस. च्या विचारांशी त्यांची नाळ जोडलेली होती. ते उच्चविद्या विद्याविभूषीत मितभाषी बहुआयामी व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. संभाजीराव पगारे यांचा संपूर्ण आयुष्यातील जीवनप्रवास हा खरोखरच संघर्षमय होता. कादंबरीत जिद्द, चिकाटी आणि ध्येयाने प्रेरित, राखेतून उठून आभाळ ठेंगणे करणाऱ्या असामान्य व्यक्तित्व म्हणून मुक्तेय कादंबरीत लेखक साहेबराव नंदन त्यांनी संभाजीरावांची छबी निर्माण केली आहे. असे उद्गागार कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. संरक्षण राज्यमंत्री सुभाष भामरे यांनी प्रकाशना दरम्यान काढलेत. .

गावगाडाकार साहेबराव नंदन लिखित मुक्तेय कादंबरीत संभाजीरावांच्या जन्मापासून ते अंत्येष्ठी पर्यंतच्या सर्वच प्रसंगाचा धावता धांडोळा अखेरच्या प्रवासापर्यंत रेखाटण्यात लेखक म्हणून ते यशस्वी ठरले असून, मुक्तेय कादंबरी ही एका धगधगत्या अग्नी कुंडातील वादळी झंझावाताची अखेर असून, आजच्या पिढीला प्रेरणा देणारी आहे. असे विचार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपाचे प्रवक्ते संजय शर्मा यांनी मांडले.

ह्या प्रसंगी पुस्तकावर परिक्षक प्रा. एल. जी. सोनवणे, भाजपाचे बबनराव चौधरी,ज्ञानसिंधु प्रकाशनाचे तान्हाजी खोडे, यांनी आपले विचार मांडले. लेखक साहेबराव नंदन यांनी पुस्तकाची निर्मिती ते कुळकथा विषद



केली.पगारे परिवाराच्या वतीने स्वप्नील पगारे, सौ. छाया पगारे यांनी व्यासपिठावरील सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान केला. प्रास्ताविक जेष्ठ पत्रकार राजेंद्र गवळी यांनी केले तर सुत्रसंचालन भैय्या गांगुर्डे यांनी केले. पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात संभाजीराव पगारे यांचा प्रथम वर्ष पुण्यस्मरण सोहळ्यात व्ही. एन. जीरेपाटील, प्रा. डी. टी. पाटील, आर. के. पाटील, भास्कर पाटील, अशोक पाटील, संजीव अहिरे सह अनेक समाज बांधवांनी श्रध्दांजली वाहिली. ह्या प्रसंगी जिल्हा व जिल्ह्या बाहेरील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील बहुसंख्य बांधव उपस्थित होते. शेवटी सुधीर अकलाडे यांनी आभार मानले.



श्रीराम नवमीच्या निमित्ताने बीड शहरात आयोजित भव्य शोभायात्रेत सहभागी होऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व रामभक्तांना श्रीराम जन्मोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# शिरूर तालुक्याला साहित्य संस्कृतीचा मोठा वारसा - मा.आ.उषाताई दराडे

शिरूर कासार :- (प्रशांत बाफना)

ग्रामीण भागामध्ये मराठी साहित्य संमेलनांचे आयोजन करणे अत्यंत गरजेचे असून या संमेलनांच्या माध्यमातून भाषेवरोबरच साहित्य व संस्कृती जोपासण्याचेही काम होत आहे. शिरूर कासार सारख्या बहुसंख्य ऊसतोड कामगार असलेल्या तालुक्यात एकता फाउंडेशनच्या माध्यमातून साहित्य आणि संस्कृती रुजविण्यासह ती जोपासण्याचेही कार्य अखंडपणे सुरू असून या फाउंडेशनच्या पाठीशी बुद्धिवंत आणि विचारवंतांनी ताकदीने उभे राहण्याची आवश्यकता असल्याचे मत माजी आमदार तथा आठव्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा ड.उषाताई दराडे यांनी व्यक्त केले. त्या पाडळी येथे आयोजित केलेल्या आठव्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर सरपंच गहिनीनाथ पाखरे, माजी सरपंच रामदास हंगे यांच्यासह एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, केंद्रप्रमुख निवृत्ती बेदरे, लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष लखुळ मुळे, संचालक पी.आर.खेडकर, संचालिका रंजना फुंदे, लता कराड, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ.बाळासाहेब सानप, डॉ.स्नेहल सानप, एकताचे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश प्रवक्ते मल्हारी खेडकर यांची उपस्थिती होती.

दोन दिवसीय संमेलनात माजी आमदार उषाताई दराडे यांनी पूर्ण वेळ उपस्थित राहून संमेलनातील सर्व कार्यक्रमांचा आस्वाद घेतला. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. सामाजिक प्रदूषण एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढले आहे की त्याला आवर घालण्यासाठी संस्कारांची गरज आहे आणि हे संस्कार अशा संमेलनाच्या माध्यमातून आपल्याला मिळतात. साहित्यिक हे ग्रामीण भागातील वातावरणात घडणाऱ्या घडामोडींचे यथार्थ वर्णन आपल्या शब्दात मांडून साहित्याची निर्मिती करतात.



ग्रामीण भागात जे साहित्य तयार होते त्यामध्ये अनुभवांचे प्रतिबिंब दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून ज्या गोष्टींची गरज आहे ते त्यांना वास्तव पद्धतीने दिले गेले पाहिजे असे मत देखील ड.दराडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी पाडळी गावातील विविध क्षेत्रात गुणवंत ठरलेल्या भूमिपुत्रांचा संमेलनाध्यक्षांच्या हस्ते एकता फाउंडेशन च्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. समारोप सत्रात वेगवेगळे ठराव मंजूर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास तुपे यांनी तर आभार शिवलिंग परळकर यांनी मानले

# पवित्र रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर समाजात प्रेम, एकोपा आणि बंधुभाव वाढवण्याच्या उद्देशाने

## 'ईद मिलन सोहळा' मोठ्या उत्साहात साजरा

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी )

पवित्र रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर समाजात प्रेम, एकोपा आणि बंधुभाव वाढवण्याच्या उद्देशाने शेख खाजा मामु (नगर सेवक तथा गटनेते) गेल्या तीस ते पस्तीस वर्षा पासून ईद मिलन सोहळा आयोजित करण्यात येत आहे या वर्षी पण त्यांच्या वतीने 'ईद मिलन सोहळा' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा सोहळा शुक्रवार रोजी राजगल्ली परिसरात त्यांच्या राहत्याघरी पार पडला.

या कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील व शहरातील विविध समाजातील नागरिकांनी तसेच विवीध पक्ष्याच्या पद अधीकारीनी तसेच विवीध शासकीय कार्यालायतील अधिकारी तसेच कर्मचारी वर्गानी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान सामाजिक एकतेचा संदेश देत सर्वांनी प्रेम व बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

'ईद मिलन सोहळ्याला' माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस अमरसिंह पंडित,गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित,रणवीर (काका) पंडित,नगर परिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके,नायब तहसीलदार संजय सोनवणे, नगर परिषद कार्यलयीन अधिकारी अजय सानप,नगर सेवक शाहरुख खा पठाण,नगर सेवक प्रशांत



राख,नगर सेवक शेख शहेदाद,सरपंच संघटना अध्यक्ष कालिदास नवले, पत्रकार संघाचे ता अध्यक्ष मधुकर तौर,माजी नगरसेवक अमोल करांडे, बाळासाहेब सानप, संपादक अमोल वैद्य, पत्रकार प्रदीप नाना जोशी, पत्रकार विनोद पौळ,आर पी आय तालुकाध्यक्ष किशोर जी कांडेकर, शेख राजू सेठ, पत्रकार शेख जावेद सर,सामाजिक कार्यकर्ते शेख जफर (टेलर), पत्रकार शेख खाजा, उद्योजक शेख फेरोज (राज),उद्योजक हसनुद्दीन सौदागर, आंदोलने लाईव्ह चे अविनाश इंगावले इतर मान्यवर उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत शेख खाजा मामु यांचे सत्कार करण्यात आले तसेच शेख खाजा मामु यांनी या वेळी मान्यवरांचे सत्कार केले व ईदच्या व ईद मिलन सोहळ्याला उपस्थिती लावल्या बद्दल शुभेच्छा दिल्या.ईद मिलन सोहळा यशस्वी करण्यासाठी शेख मोहसीन खाजा (भाऊ),शेख मोईन खाजा,शेख लतीफ,शेख उस्मान, शेख अतिक व मोहसीन भाऊ मित्र मंडळ परिश्रम घेतले.

# केपीसीए को. च्या नवीन शाखेच्या उद्घाटन समारंभास उपस्थित राहावे - घुंबार्डे बंधू

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी ): पुणे येथील नामांकित चार्टर्ड अकाउंटंट फर्म केपीसीए को. यांच्या नवीन शाखेचे उद्घाटन गेवराई येथे दि. २८ मार्च २०२६ शनीवार रोजी सकाळी १०:३० वाजता ह.भ.प. महंत दिलीप (बाबा) घोगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या निमित्ताने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन घुंबार्डे बंधू यांनी केले आहे.

गेवराई शहर व परिसरातील नामांकित अशा घुंबार्डे परिवारातील उद्योजक श्री. मधुकर घुंबार्डे यांचे चिरंजीव श्री. पृथ्वीराज घुंबार्डे हे नुकतेच चार्टर्ड अकाउंट परीक्षा उत्तीर्ण होऊन पुणे येथील

केपीसीए को. (घझउ-उे.) मध्ये कार्यरत आहेत. गेवराई व परिसरातील व्यापारी, उद्योजक, डॉक्टर, वकील, शिक्षक व नागरिकांना अकाउंटिंग, इनकम टॅक्स, जीएसटी आणि ऑडिट या सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावी. या उद्देशाने ते गेवराई येथे नवीन शाखा सुरू करत आहेत. या शाखेमुळे आर्थिक व कर सल्ला सेवा अधिक सुलभ होऊन नागरिकांना याचा लाभ होणार आहे. या शाखेचे उद्घाटन ह.भ.प. महंत दिलीप (बाबा) घोगे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमास माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, मा. बाळराजे दादा पवार व सी.ए. चिन्मय पंडित यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या शुभप्रसंगी सर्व नागरिक, व्यापारी व हितचिंतकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे नम्र आवाहन माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, बाबासाहेब घुंबार्डे, विष्णुपंत घुंबार्डे, प्राचार्य राजाभाऊ घुंबार्डे, उप नगराध्यक्ष भगवानराव घुंबार्डे, संजय घुंबार्डे व मधुकर घुंबार्डे यांनी केले आहे.